सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, १३ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रत्नागिरीत ८ मार्चपासून पाच दिवसांचा कृषी महोत्सव

रत्नागिरी : येथील कै. प्रमोद महाजन क्रीडा संकुलात ८ ते १२ मार्च असे पाच दिवस कृषी प्रदर्शन होणार आहे. यामध्येच पशु-पक्षी प्रदर्शनदेखील भरविण्यात येणार आहे. आत्मा, कृषी, बँकर्स, जिल्हा परिषद कृषी-पशुसंवर्धन, जिल्हा नियोजन अशा सर्व विभागांनी एकत्रित येऊन समन्वयाने कृषी प्रदर्शन यशस्वी करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात कृषी प्रदर्शनाच्या पूर्वतयारीबाबत आज बैठक घेण्यात आली. बैठकीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले, आत्माचे प्रकल्प संचालक विजय बेतीवार, अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक मुकुंद खांडेकर, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी सूचित वंजारे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, कृषी विद्यापीठ, बँकर्स, जिल्हा परिषद, कृषी विभाग, एनआरएलएम या सर्वांनी आपापले स्टॉल उभारून योजनांची माहिती द्यावी. शेतकरी, उत्पादक, महिला बचत गट यांच्यासाठी माहितीप्रदान परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित करावेत. ८ मार्च या महिला दिनानिमित्त विशेष स्पर्धात्मक कार्यक्रम घ्यावेत. प्रदर्शनाच्या सुरुवातीला प्रवेशद्वारावर क्युआर कोडच्या माध्यमातून माहिती प्रदर्शित करावी.श्री. सदाफुले आणि श्री. बेतीवार यांनी यावेळी संगणकीय सादरीकरण करुन सविस्तर माहिती दिली.

# ऊस तोडणी यंत्रासाठी राज्याने केंद्राला सुधारित प्रस्ताव सादर करावा - गडकरी

नवी दिल्ली : केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्रास अनुदान प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी आज केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे बैठक झाली. या बैठकीत सन २०२२-२३ पासून राज्यात राबविण्यात येत असलेल्या योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी राज्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त कुणाल खेमणार, केंद्र शासनाच्या कृषी विभागाचे सह सचिव व अन्य अधिकारी उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत ९०० ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी शासनाने मान्यता दिली असून आत्तापर्यंत राज्यातील २५७ पात्र लाभार्थ्यांनी ऊस तोडणी यंत्राची खरेदी केली आहे. त्यापैकी ११६ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम वितरित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्र खरेदी किंमतीच्या ४०% अथवा कमाल रु. ३५ लाख अनुदान देण्यात येते. उर्वरित १४१ लाभार्थ्यांना देय असलेली केंद्र शासनाच्या हिस्याची रक्कम त्वरित वितरित करण्याबाबत कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी बैठकीत विनंती केली.

या योजनेचा राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी मजुरांच्या संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्यांना अधिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने योजनेत सुधारणा करून सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास त्वरित प्रस्ताव सादर करण्याचे केंद्रीय मंत्री श्री नितिन गडकरी यांनी निर्देश दिले. या सुधारित प्रस्तावास केंद्र शासनाची त्वरित मान्यता देण्यात येईल असे श्री गडकरी यांनी स्पष्ट केले.


## फ्रान्सला पोहोचण्यापूर्वी पंतप्रधान मोदींचं विमान होतं पाकिस्तानच्या हद्दीत

लाहोर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पॅरिस भेटीदरम्यान त्यांच्या विमानाने पाकिस्तानच्या हवाई हद्दीचा वापर केला. 'इंडिया १' या विमानाने मोदी पॅरिस दौऱ्यावर गेले.हे विमान शेखुपुरा, हाफिजाबाद, चकवाल आणि कोहट भागातून पाकिस्तानात घुसले आणि सुमारे ४६ मिनिटे पाकिस्तानी सीमेत राहिले.

मिळालेल्या माहितीनुसार, अफगाणिस्तानची हवाई हद्दी बंद झाल्यामुळे भारतीय पंतप्रधानांच्या विमानाला पाकिस्तानच्या हवाई हद्दीतून जाण्याची परवानगी देण्यात आली. नरेंद्र मोदींच्या विमानाने पाकिस्तानच्या हवाई हद्दीचा वापर करण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या वर्षी ऑगस्ट २०२४ मध्ये, मोदींच्या विमानाने पोलंड ते दिल्ली प्रवासादरम्यान पाकिस्तानच्या हवाई हद्दीचा वापर केला होता. त्यावेळी विमान रात्री ११ वाजता पाकिस्तानी हद्दीत घुसले आणि ४६ मिनिटे तिथेच राहिले.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या फ्रान्स दौऱ्यावर होते. त्यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतली. त्यानंतर पंतप्रधान मोदी एआय समिटला उपस्थित राहिले, या ठिकाणी विविध देशांचे प्रमुख नेते देखील उपस्थित होते.

## राम मंदिराचे मुख्य पुजारी सत्येंद्र दास कालवश



लखनऊ, १२ फेब्रुवारी : अयोध्येच्या श्रीराम मंदिराचे मुख्य पुजारी सत्येंद्र दास यांचे आज, बुधवारी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते. सत्येंद्रदास यांना ३ फेब्रुवारी रोजी मेंदूत रक्तस्त्राव झाल्यानंतर लखनऊच्या पीजीआय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर न्यूरोलॉजी वॉर्डात उपचार सुरू असताना सकाळी ८ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

सत्येंद्रदास यांचे शिष्य त्यांचे पार्थिव घेऊन अयोध्येला रवाना झाले आहेत. त्यांच्या पार्थिवावर उद्या, गुरुवारी (१३ फेब्रुवारी) शरयू नदीच्या काठी अंत्यसंस्कार होणार आहेत. फेब्रुवारी १९९२ मध्ये जेव्हा वादग्रस्त जमिनीमुळे रामजन्मभूमीची जबाबदारी जिल्हा प्रशासनाकडे सोपवण्यात आली, तेव्हा जुने पुजारी महंत लालदास यांना काढून टाकण्याबाबत चर्चा सुरू झाली. त्यानंतर १ मार्च १९९२ रोजी सत्येंद्र दास यांची नियुक्ती भाजप खासदार विनय कटियार, विश्व हिंदू परिषद नेते आणि तत्कालीन विश्व हिंदू परिषदेचे प्रमुख अशोक सिंघल यांच्या संमतीने करण्यात आली होती. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आचार्य सत्येंद्र दास यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

महान रामभक्त, श्री रामजन्मभूमी मंदिर, अयोध्या धामचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र कुमार दास महाराज यांचे निधन अत्यंत दुःखद आहे. सामाजिक आणि आध्यात्मिक जगताचे कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याचे त्यांनी आपल्या शोकसंदेशात नमूद केले आहे.

## ओलिसांना शनिवारपर्यंत सोडा; अन्यथा, गाझात सर्व काही उद्ध्वस्त करू - ट्रम्प

वॉशिंगटन , १२ फेब्रुवारी : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पॅलेस्टिनी दहशतवादी गट हमासला धमकी दिली आहे.ओलिसांना शनिवारपर्यंत सोडा अन्यथा गाझात विध्वंस होईल, सर्वकाही उद्ध्वस्त करून टाकू, अशी धमकी ट्रम्प यांनी हमासला दिली आहे. ट्रम्प यांनी इस्रायली ओलिसांना सोडण्यासाठी हमासला शनिवारी दुपारी १२ वाजेपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. ओलिसांना सोडले नाही तर युद्धविराम करार रद्द करण्याचा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प यांनी ओव्हल ऑफिसमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. युद्धबंदी सुरू ठेवायची की संपवायची याचा निर्णय सर्वस्वी इस्रायलचा असेल, परंतु उर्वरित सर्व ओलिसांना तीन किंवा चारच्या गटात सोडू नये तर एकत्रच सोडले पाहिजे. आम्हाला सर्व ओलिसांची एकाचवेळी सुटका हवी आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. हमास युद्धविराम कराराचे उल्लंघन करत असल्याचा आरोप करत इस्रायलने यापूर्वी युद्धविराम रद्द करण्याची धमकी दिली होती. ट्रम्प म्हणाले की ते शनिवारच्या अंतिम मुदतीबद्दल इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशीही बोलतील. तथापि, याबद्दल फारशी माहिती देण्यात आली नाही.

# दिल्ली : परिवहन विभागाच्या ६ अधिकाऱ्यांना अटक

### भ्रष्टाचार व लाचखोरी प्रकरणी सीबीआयची कारवाई

नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी : भ्रष्टाचार आणि लाचखोरी प्रकरणी सीबीआयने आज, बुधवारी दिल्ली परिवहन विभागाच्या ६ अधिकाऱ्यांना अटक केली आहे. गेल्या काही दिवसातील सीबीआयची ही मोठी कारवाई आहे.

दिल्लीच्या परिवहन विभागातील भ्रष्टाचाराविरुद्ध सीबीआयकडे तक्रारी आल्या होत्या. संबंधित अधिकार्यांवर कारवाईपूर्वी तक्रारींचे पडताळणी करण्यात आली. तक्रारींची पडताळणी करताना विविध पातळ्यांवर भ्रष्टाचार झाल्याचे प्राथमिक माहिती मिळाली.यानंतर सीबीआयने परिवहन विभागाच्या ६ अधिकाऱ्यांना अटक केली. या कारवाईवर प्रतिक्रिया देताना काँग्रेस नेते उदित राज म्हणाले की, यापूर्वीचे आम आदमी पार्टीचे सरकार भ्रष्ट होते. जल बोर्ड घोटाळा, कॅग अहवाल, दारू घोटाळा असे अनेक घोटाळे या सरकारच्या काळात झाले. आता भाजपचे सरकार आले आहे. नवीन सरकार प्रत्यक्षात भ्रष्टाचाराविरोधात कोणती कारवाई करते ते पाहूया असे उदित राज म्हणालेत.

## अमेरिकेत १७ फेब्रुवारीला होणार विठ्ठलाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना



सोलापूर : अमेरिकेतील सीएटल येथील भारतीय तरुण रेडमंड येथील श्री साईबाबा मंदिरामध्ये महाराष्ट्राचे दैवत श्री विठ्ठल-रखुमाई, शेगावचे संत गजानन महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सोमवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार असून तत्पूर्वी १५ फेब्रुवारीपासून विविध धार्मिक कार्यक्रमांना आरंभ करण्यात येणार आहे.

सीएटल परिसरातील रेडमंड येथे साईबाबा मंदिर आहे. याठिकाणी मराठी तरुणांनी महाराष्ट्राचे लोकदैवत श्री विठ्ठल-रखुमाई, संत गजानन महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याच संकल्प काही काळापूर्वी सोडला होता. त्याची पूर्तता आता होत आहे. यानिमित्त १५ आणि १६ फेब्रुवारीला गोमाता पूजन, होम-हावन, भजन, यज्ञ, पारायण, हरिपाठ पठण तसेच महाप्रसादाचे वाटप हे कार्यक्रम होणार आहेत. सोमवारी (दि. १७) श्री विठ्ठल-रखुमाई, संत गजानन महाराज मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा मुख्य कार्यक्रम होत आहे. यानिमित्त भारतातील १०८ नद्यांचे जल, पवित्र माती आणली आहे. याचा उपयोग अनुक्रमे अभिषेकासाठी आणि मूर्तीचा पाया भरण्यासाठी केला जाणार आहे.

## नाशकात पेंटिंग काम करणाऱ्या दोन मजुरांचा खाली पडल्याने मृत्यू

नाशिक, १२ फेब्रुवारी - शहरातील सातपूर मधील ध्रुवनगर परिसरात एका बांधकाम साईटवर इमारतीला पेंटींगचे काम करणाऱ्या, दोन कामगारांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना काल घडली आहे. ध्रुवनगर येथील मधुलक्ष्मी या खाजगी बांधकाम साईटवर, इमारतीला काल सायंकाळच्या सुमारास तुळशीराम माळी (वय ४०, रा. श्रमिकनगर) हे लाकडी झुल्यावर बसून दुसऱ्या मजल्याला रंग काम करत होते.

सदर झुल्या ची दोरी टेरेस वरून, विवेक कुमार (वय २६, मुळ रा. बिहार, हल्ली रा. श्रमिकनगर) याने पकडली होती.

## महाकुंभ : माघ पौर्णिमेला दीड कोटी भाविकांचे स्नान



प्रयागराज : उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे आयोजित महाकुंभमेळ्यात माघ पौर्णिमेच्या निमित्ताने आज, बुधवारी सुमारे दीड कोटी भाविकांनी त्रिवेणी संगमात स्नान केल्याची माहिती प्रशासनाने दिली.

प्रयागराजमध्ये त्रिवेणी संगमापासून १० किलोमीटर पर्यंत सर्वत्र भाविकांची गर्दी दिसून आली. याठिकाणी मंगळवारी संध्याकाळपासूनच माघी पौर्णिमेचे स्नान सुरू झाले होते. रात्री उशिरा मोठ्या संख्येने भाविक संगमावर पोहोचले. तर आज, बुधवारी सकाळी भाविकांची संख्या वाढली.

हे स्नान बुधवारी संध्याकाळपर्यंत सुरू होते. दिवसभरात सुमारे अडीच कोटी भाविक त्रिवेणी संगमात स्नान केले असा अंदाज प्रशासनाने वर्तवला आहे. माघ पौर्णिमा स्नानासाठी आलेल्या भाविकांवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. वाढती गर्दी पाहता प्रयागराजमध्ये वाहनांना प्रवेश बंद असून महाकुंभमेळा क्षेत्र 'नो व्हेईकल झोन' घोषित करण्यात आले होते.

उत्तर प्रदेशचे डीजीपी प्रशांत कुमार यांनी सांगितले की, महाकुंभातील हे पाचवे स्नान आहे. महाशिवरात्रीचे स्नान अजून बाकी आहे. मौनी अमावस्येच्या दिवशी एक चूक झाली. त्यातून धडा घेऊन अधिक चांगले व्यवस्थापन कसे करायचे, यावर आम्ही काम करत आहोत.

तर रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शशिकांत त्रिपाठी यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून प्रयागराज रेल्वे स्थानकांवर भाविकांची गर्दी कायम आहे. दररोज १०० हून अधिक विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. शहरात मंगळवारी रात्री ९ वाजेपर्यंत १०८ विशेष गाड्या चालवण्यात आल्या. यात उत्तर मध्य रेल्वेने ८१ गाड्या, उत्तर रेल्वेकडून १० आणि ईशान्य रेल्वेने १७ विशेष गाड्या चालवण्यात आल्या. त्याचबरोबर, विशेष गाड्यादेखील सतत चालवल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## काँग्रेसचा सज्जन कुमार १९८४च्या शिख दंगली प्रकरणी दोषी

नवी दिल्ली : भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्लीत शिखविरोधी दंगल उसळली होती. या दंगलीला चिथावणी देऊन हत्या घडवून आणल्याप्रकरणी काँग्रेसच्या सज्जन कुमारला दोषी ठरवण्यात आले आहे. दिल्लीच्या राउज ॲव्हेन्यू न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. सज्जन कुमारच्या शिक्षेबाबत १८ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे. यानंतर सज्जन कुमारला द्यायच्या शिक्षेबाबतचा निर्णय न्यायालयाकडून दिला जाईल.

ज्या प्रकरणात सज्जन कुमारला दोषी ठरवले आहे ते प्रकरण १ नोव्हेंबर १९८४ चे आहे. दिल्लीच्या सरस्वती विहारमध्ये वडील आणि मुलाची हत्या करण्यात आली होती. ही हत्या करणाऱ्या जमावाचे नेतृत्व सज्जन कुमारने केले होते. जमावाला सज्जन कुमारने चिथावणी दिली. यानंतर जमावाने बापलेकाला जीवंत जाळले होते. यानंतर घरात लुटालूट करण्यात आली. घरातील इतर सदस्यांना जखमी करण्यात आले.

जसवंत सिंह आणि तरुणदीप सिंह यांची हत्या करण्यात आली आणि घरातील इतर सदस्यांना जखमी करण्यात आले. या प्रकरणात सज्जन कुमार विरोधात १६ नोव्हेंबर २०२१ रोजी न्यायालयाने आरोप निश्चित केले. सुनावणीअंती न्यायालयाने १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सज्जन कुमारला दोषी ठरवले.

# डोंबिवली पूर्वेला बोगस सहकारी बँक




डोंबिवली : डोंबिवली पूर्वेला आगरकर मार्गावर एका सहकारी बँकेच्या माध्यमातून नव्या आर्थिक घोटाळ्याची तयारी सुरू होती. पण सावध असलेल्या यंत्रणेने वेळीच कारवाई केल्यामुळे संभाव्य घोटाळा टळला आहे. नाही तर मुंबईतील टोरेस घोटाळ्याप्रमाणे डोंबिवलीतही मोठा घोटाळा होण्याचा धोका होता.

डोंबिवलीत फिनशार्प सहकारी बँक नावाने एक सहकारी बँक सुरू झाली. नियमानुसार कोणत्याही सहकारी बँकेला नोंदणी करणे बंधनकारक आहे. पण रिझर्व्ह बँकेने २००२ पासून आतापर्यंत एकाही सहकारी बँकेची नोंदणी केलेली नाही. नोंदणी नसूनही फिनशार्प सहकारी बँकेने साडेबारा टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून ठेवी गोळा करण्याची तयारी सुरू केली होती. कमीत कमी कागदपत्रे, किमान व्याजदरात कर्ज, पारदर्शक व्यवहार आणि पुढील दोन वर्षे ठेवींवर १२.५ टक्के व्याज अशी आकर्षक जाहिरात बँकेने सुरू केली होती. या प्रकाराची माहिती मिळताच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सहकार आयुक्तांकडे तक्रार केली. बँक सहकारी असल्याचे भासवले जात असले तरी तिची नोंदणी सहकार आयुक्तांकडे झालेली नसल्याचेही उघड झाले. बँकेचे संचालक म्हणून फक्त चार जणांची नावं सांगितली जातात. नियमानुसार संचालक मंडळाची स्थापना झालेली नाही आणि त्याची माहिती संबंधित सरकारी यंत्रणेला देण्यात आलेली नाही.

सहकार विभाग आणि पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत सहकार विभाग किंवा केंद्रीय सहकार निबंधकाची परवानगी नसल्याचे समोर आले आहे. बँकेने शहरात दोन ठिकाणी कार्यालये थाटून जाहीरातबाजी सुरू केल्याचेही आढळून आले आहे. अनिल सिन्हा, सतीश पाटील, मनिष सवाणे आणि किरण पाटील हे बँकेचे संस्थापक संचालक असून बँकेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियमाप्रमाणे राज्य अथवा केंद्र सरकारच्या निबंधकाकडे नोंदणी झालेली नसल्याचे सहकार उपनिबंधकांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत आढळून आले आहे.

नोंदणी नसताना बँक सुरू करणे हा सहकार कायद्याच्या कलम १४८ नुसार गुन्हा ठरत असल्याने बँकेला कारणे दाखला नोटीस बजावण्यात आली असून १४ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे. आवश्यक माहिती आणि कागदपत्रे सादर न केल्यास कठोर कारवाईचा इशारा उपनिबंधनक राम कुलकर्णी यांनी दिला.

## देशात तीन दिवसांत आठ राज्यांत पावसाची शक्यता

नवी दिल्ली : उत्तर भारतातील मैदानी भागातल्या थंडीची जागा आता उकाडा घेऊ लागला आहे. लवकरच देशातील अनेक राज्यांमध्ये उकाडा जाणवू लागेल. पण वातावरण बदलण्याच्या सुमारास देशातील आठ राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, सिक्कीम या आठ राज्यांमध्ये १२ ते १४ फेब्रुवारी दरम्यान मुसळधार पावसाची आणि वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. विजांच्या कडकडाटात तसेच ढगांच्या गडगडाटात मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज आठ राज्यांसाठी हवामान विभागाने वर्तविला आहे.

ईशान्य भारतात पाऊस पडणार असल्यामुळे मध्य भारतात थंडीची तीव्रता वाढेल. पूर्व भारतात तसेच वायव्य भारतात उकाडा वाढेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. दिल्ली एनसीआरमध्ये उकाडा वाढण्यास सुरुवात झाली आहे. दिवसा तापमान २७ अंश से. च्या आसपास राहील, असा अंदाज आहे.

# अंतराळवीर सुनीता विल्यम्सची लवकरच होणार 'घरवापसी'!

### नासाने जाहीर केले नवीन वेळापत्रक



नवी दिल्ली : भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स गेल्या वर्षी ५ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात संशोधनासाठी गेली होत्या. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून एक किंवा दोन आठवड्यांत ते परततील, अशी अपेक्षा नासाने व्यक्त केली होती. मात्र, आठ महिने उलटले तरी अद्याप 'स्टारलायनर' पृथ्वीवर परतले नाही. त्यांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी नासाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. अशातच आता सुनीता विल्यम्सची लवकरच घरवापसी होणार असल्याची नासाकडून शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सुनीता विल्यम्स यांच्याबाबत परतीचा मुक्काम वाढतच चालला असून केवळ तारीख पे तारीख जाहीर करण्यात येत आहे. यामुळे स्पेसएक्स अंतराळवीर उड्डाणांसाठी कॅप्सूलची जागा घेईल, असे नासाकडून सांगण्यात आले आहे. बुच विल्मोर आणि सुनीता विल्यम्स यांना मार्चच्या अखेरीस किंवा एप्रिलच्या ऐवजी मार्चच्या मध्यात घरी परत आणता यावे म्हणून हा बदल करण्यात आला आहे.

नासाने काय म्हटले?

नासाने म्हटले आहे की, सुनीता विल्यम्स आणि बुच बिल्मोर यांना आणण्यासाठी १२ मार्च रोजी कॅप्सूल लाँच केले जाईल. स्पेसएक्स क्रू ड्रॅगन कॅप्सूल बदलण्याचा पर्याय निवडल्यामुळे अंतराळवीरांना परत आणण्यासाठी नवीन वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. आता कॅप्सूल १२ मार्च रोजी 'मिशनच्या तयारीच्या अधीन' लाँच होईल. याचा अर्थ असा की, नवीन तारीख विल्यम्स आणि विल्मोरच्या नियोजित परतीच्या दिवसांच्या आधीची असण्याची शक्यता आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पेसएक्सचे सीईओ एलोन मस्क यांना सुनीता विल्यम्स यांना पृथ्वीवर आणण्याचे मिशन लवकरात लवकर पूर्ण करण्यास सांगितले होते.

## महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकासाचा प्रश्न मार्गी लागणार -मुख्यमंत्री

नाशिक, १२ फेब्रुवारी, - पुढील पाच वर्षामध्ये महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकास करण्याचा संकल्प राज्य शासनाने केला आहे. काही ठिकाणी विकास कामांना सुरुवात झाली आहे, उर्वरित ठिकाणी लवकरच कामे सुरु होतील, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या हदगाव येथील श्री गुरुवर्य बापूनगर परिसरातील श्रीकृष्ण देव उखळाई मंदिराच्या नवपर्व व कलशारोहण सोहळ्या प्रसंगी दिले. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकासाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

## पीएनबी बँक घोटाळा आरोपी मेहुल चोक्सीला कॅन्सर

मुंबई : पंजाब अँड नॅशनल बँक अर्थात पीएनबी घोटाळा प्रकरणातील आरोपी मेहुल चोक्सी याला कॅन्सर झाला असून तो बेल्जियममध्ये उपचार घेत आहे, अशी माहिती त्याच्या वकिलाने विशेष न्यायालयाला दिली. हिरे व्यापारात गुंतलेला मेहुल चोक्सी पीएनबीकडून उचललेले कोट्यवधी रुपयांचे कर्ज फेडण्याऐवजी फरार झाला आहे. मेहुल विरोधात कायदेशीर कारवाई सुरू आहे. या कारवाई दरम्यान मेहुल चोक्सीच्या वकिलाने विशेष न्यायालयाला त्याच्या तब्येतीबाबत माहिती दिली.

मेहुल चोक्सी याला आर्थिक गुन्ह्यातील फरार आरोपी जाहीर करावे, अशी मागणी सक्तवसुली संचालनालयाने आर्थिक गैरव्यवहारांशी संबंधित मुंबईतील विशेष न्यायालयाकडे केली आहे. ईडीच्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी मेहुल चोक्सी बेल्जियममध्ये वैद्यकीय उपचार घेत असल्याचे त्याच्या वकिलाने विशेष न्यायालयाला सांगितले.

मेहुल चोक्सी याला फरार आर्थिक गुन्हेगार असे जाहीर केल्यास त्याची मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार ईडीला मिळतील. पण चोक्सीच्या वकिलाने मेहुल आजारी असल्याचे सांगून जप्तीची कारवाई टाळण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

पीएनबीचे १३ हजार ४०० कोटी रुपये बुडवून मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदी हे दोघे देशाबाहेर पळून गेले आहेत. या प्रकरणी मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी विरोधात सीबीआय आणि ईडी या दोन्ही केंद्रीय तपास संस्थांनी गुन्हे नोंदवले आहेत. वारंवार समन्स बजावूनही मेहुल चोक्सी ईडीच्या चौकशीला हजर झालेला नाही. यामुळे ईडीने मेहुल चोक्सीला फरार जाहीर करण्यासाठी विशेष न्यायालयात अर्ज केला आहे. हा अर्ज २०१८ मध्येच करण्यात आला आहे. या संदर्भातल्या कारवाई वेळी चोक्सीच्या वकिलाने विशेष न्यायालयाला मेहुलच्या तब्येतीबाबत माहिती दिली.

## अहिल्यानगरमध्ये जेके कनेक्ट कार्यक्रमाद्वारे जेके पेपर व्यापार भागीदारी मजबूत

अहिल्यानगर – भारतातील कॉपियर बाजारपेठेत नेहमीच आघाडीवर राहिलेली भारतीय पेपर कंपनी जेके पेपर लिमिटेडने अहिल्यानगरमध्ये यशस्वी जेके कनेक्ट कार्यक्रम आयोजित करून बाजारपेठेतील आपले नेतृत्व आणि उत्कृष्टतेची वचनबद्धता आणखी दृढ केली. या उपक्रमाचे उद्दिष्ट नोकरदार, स्टेशनर्स आणि पुनर्विक्रेत्यांसह प्रमुख भागधारकांशी मजबूत संबंध निर्माण करणे आहे, ज्यामुळे या प्रदेशात जेके पेपरची उपस्थिती आणखी मजबूत होईल.महाराष्ट्रातील एक प्रमुख बाजारपेठ असलेल्या अहिल्यानगरमध्ये एकूण कागद बाजारपेठेचा आकार १५० मेट्रिक टन आहे, ज्यामध्ये जेके पेपरचा सध्या ५० मेट्रिक टन बाजार हिस्सा आहे. या क्षेत्रातील प्रमुख खेळाडूंमध्ये बी२बी, त्यानंतर इको राइज आणि रिफ्लेक्शन यांचा समावेश आहे. या कार्यक्रमात सुमारे ६५ डीलर्स उपस्थित होते, ज्यांनी जेके पेपरच्या शाश्वत उत्पादन श्रेणी आणि दैनंदिन जीवनात सुधारणा करण्यातील त्याच्या भूमिकेबद्दल चर्चा केली. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे जॉबर्स कनेक्ट कार्यक्रमावरील एक सत्र होते ज्याचा उद्देश व्यापार नेटवर्क मजबूत करणे आणि वाढत्या कागद उद्योगाबद्दल मौल्यवान माहिती प्रदान करणे होता.

## ग्लासगो विद्यापीठाने भारत भेटी दरम्यान बायोकॉनसोबत नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमाची घोषणा केली

मुंबई– ग्लासगो विद्यापीठाने भारतीय बायोफार्मास्युटिकल कंपनी बायोकॉनसोबत भागीदारी करून एक अनोखा आणि रोमांचक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमांतर्गत, औद्योगिक जैवतंत्रज्ञानात एमएससीचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना बेंगळुरूमधील बायोकॉन येथे सहा आठवड्यांची इंटर्नशिप करण्याची संधी मिळेल. सप्टेंबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात सहा विद्यार्थ्यांना बायोकॉन आणि त्यांच्या कंत्राट संशोधन आणि विकास उपकंपनी, सिनजीनच्या ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण मिळेल. विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च या पदवी अंतर्गत भागवला जाईल आणि स्टायपेंड बायोकॉनकडून दिला जाईल. भारत हा ग्लासगो विद्यापीठाचा एक प्रमुख भागीदार आहे. विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या संख्येत भारतीय विद्यार्थी दुसऱ्या क्रमांकावर आहेत. विद्यापीठाचे एक शिष्टमंडळ मुंबई, बेंगळुरू आणि दिल्लीच्या दौऱ्यावर असताना ही घोषणा करण्यात आली. या कालावधीत, प्रतिनिधींनी संभाव्य विद्यार्थ्यांना भेटले आणि प्रमुख भागीदार आणि भागधारकांसह वर्तमान आणि भविष्यातील शिक्षण आणि संशोधन सहकार्यांवर चर्चा केली.

## एल्जीने ग्राउंड-ब्रेकिंग स्टॅबिलायझर तंत्रज्ञानाचे अनावरण

पुणे : औद्योगिक एअर कंप्रेशन क्षेत्रात मोठी झेप घेत, एल्जी उपकरणे (बीएसई: ५२२०७४ एन एस ई: एल्जी इक्विपमेंट्स), ज्याला ६४ वर्षांहून अधिक काळ कंप्रेस्ड एअर एक्सीलेंसचा अनुभव आहे आणि जगभरातील आघाडीच्या एअर कंप्रेसर उत्पादकांपैकी एक मानले जाते, यांनी आज त्यांच्या अग्रगण्य कंप्रेस्ड एअर स्टॅबिलायझेशन तंत्रज्ञानाची घोषणा केली. स्टॅबिलायझर सिस्टम प्लांटमधील डायनॅमिक एअर डिमांडनुसार कंप्रेसर कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. याचा उद्देश अस्थिर कंप्रेसर कार्यक्षमता, अक्षमता आणि वारंवार होणाऱ्या लोड/अनलोड सायकलमुळे होणारे अतिरिक्त घर्षण यांसारख्या जुन्या आव्हानांना दूर करणे आहे. औद्योगिक सेटअपमध्ये, कंप्रेसर क्षमता आणि प्लांट एअर डिमांड यामधील तफावत स्वाभाविकरित्या डायनॅमिक असते. ही अस्थिरता वारंवार कट-इन आणि कट-आउट ऑपरेशन्स घडवून आणते, ज्यामुळे कंप्रेसर अस्थिर होतो आणि त्याच्या महत्त्वाच्या फ्लो आणि काइनेटिक कंपोनेंट्स प्रभावित होतात. पारंपरिक उपाय, जसे की रिझर्वॉयर व्हॉल्यूम वाढवणे, कट-इन/कट-आउट प्रेशर बदलणे, किंवा वेरिएबल फ्रिक्वेंसी ड्राइव्हस् (तत्रऊे) जोडणे, अनेकदा अपयशी ठरतात आणि नवीन अक्षमतांना (ळपशषषळलळशपलळशी) किंवा उच्च ऑपरेशनल खर्चाला जन्म देतात.

## डाळी व्यापार, शाश्वतता आणि स्वावलंबनाचे भविष्य घडवण्यासाठी सातव्या आवृत्तीचे आयोजन!

नांदेड – : भारतातील डाळी आणि धान्य उद्योग आणि व्यापाराची सर्वोच्च संस्था तसेच जागतिक डाळी क्षेत्राचे ज्ञान केंद्र असलेल्या इंडिया पल्सेस अँड ग्रेन्स असोसिएशन (आयपीजीए) १२ ते १४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान नवी दिल्लीतील प्रगती मैदानातील भारत मंडपम येथे सातव्या द पल्सेस कॉन्क्लेव्ह २०२५ चे आयोजन करणार आहे. समृद्धीसाठी डाळी – शाश्वततेसह पोषण या थीमसह, हा कार्यक्रम स्वावलंबी होण्यासाठी भारताचे डाळी उत्पादन वाढवण्याच्या धोरणांवर, स्थिर व्यापार वातावरणासाठी धोरणात्मक चौकटींवर, कार्यक्षमता सुधारण्यासाठी तांत्रिक प्रगतीवर, जागतिक बाजारपेठेतील ट्रेंडवर, मूल्यवर्धित उत्पादने यावर भर देईल. आयपीजीएचा प्रमुख द्वैवार्षिक कार्यक्रम, द पल्सेस कॉन्क्लेव्ह , हा डाळी क्षेत्राला समर्पित जगातील सर्वात मोठा परिषद-सह-प्रदर्शन आहे. मागील आवृत्त्यांमध्ये ३० हून अधिक देशांचा सहभाग होता, ज्यामध्ये ८००+ प्रतिनिधी टीपीसी २०२५ मध्ये सहभागी होण्याची अपेक्षा आहे. या परिषदेत डाळी क्षेत्राच्या वाढीसाठी महत्त्वाच्या असलेल्या प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जाईल. यामध्ये देशांतर्गत उत्पादन आणि डाळींच्या वाढत्या वापरातील तफावत भरून काढणे, डाळींच्या उत्पादनात भारताचे आत्मनिर्भरता (आत्मानिर्भर भारत) वाढवणे आणि जागतिक अन्न आणि पोषण सुरक्षा वाढविण्यासाठी शाश्वत कृषी पद्धती वाढवणे यांचा समावेश आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटर द्वारे रस्ता सुरक्षा दूतांचे सक्षमीकरण

मुंबई –रस्ता सुरक्षेसाठी आपल्या दृढ वचनबद्धतेला अधिक बळकट करत टोयोटा किर्लोस्कर मोटरने वार्षिक टोयोटा सेफ्टी एज्युकेशन प्रोग्रॅमची(टीएसईपी) मुंबई येथे यशस्वी सांगता केली. हा कार्यक्रम सोफिया कॉलेजच्या सोफिया भाभा सभागृहामध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाने यंदाच्या वर्षातील बंगळुरू, दिल्ली आणि मुंबई या ठिकाणी झालेल्या टीएसईपी उपक्रमांचा समारोप झाला. रस्ता सुरक्षा – माझा हक्क, माझी जबाबदारी या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम शालेय विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत जागरूक करून त्यांना जबाबदार नागरिक व रस्ता सुरक्षेचे दूत बनवण्यास मदत करतो.

### जाहीर प्रगटन

दि. ११/२/२०२५

असे की, माझे पक्षकार नामे टिळक बन्सीलाल राजपूत वय ४५ वर्ष, धंदा शेती, रा लासुर रोड, गेस्ट हाउस जवळ, राजपुत वस्ती, गंगापुर ता गंगापुर जि औरंगाबाद यांनी दिलेल्या माहीती व कागदपत्रे अन्वये कळविण्यात येते की

असे की, तुम्ही अलकाबाई विजय पानकडे वय ३८ वर्ष, रा आंबेवाडी ता गंगापुर जि औरंगाबाद मौजे अंबेवाडी ता गंगापुर गट नं ५८ पैकी ८० आर तसेच तसेच त्यांचा मुलगा ऋषीकेश विजय पानकडे यांची ३८.२५ आर अशी दोघांनी मिळुन माझे पक्षकार यांच्या हक्कात ईसारपावती करारनामा दिनांक २२.८.२०२३ रोजी नोटरी धारक ॲड ओ टी झोजे यांच्याकडे दोन साक्षीदार नामे मच्छिंद्र रघुनाथ साध्ये व सुरेश रघुनाथ बोर्डे दोघे रा गंगापुर यांचे समक्ष ईसारपावती करारनामा नोंदवला असुन त्यांनी त्यांच्या मालकी व ताब्यातील मौजे आंबेवाडी ता गंगापुर येथील गट नं ५८ पैकी १ हे १८ आर जमीन ज्याच्या एकत्रित चतुः सिमा,

पुर्वेस : रामरतन पानकडे यांची शेत जमीन,
पश्चिमेस : नंदु नावंदर यांचा रस्ता शेत जमीन,
दक्षिणेस : नंदलाल हिरालाल नावंदर यांची शेत जमीन,
उत्तरेस : पाठ नांदुर मधमेश्वर कालवा विभाग.

या चतुः सिमेच्या आतील जमीन मी विकत घेणेबाबत करार केलेला असुन त्याबाबत कोणाचाही काही आक्षेप उजर हक्क असल्यास मुळ कागदपत्रासह माझे कार्यालयात कळवावा नसता व्यवहार पुर्ण करण्यात येईल.

दिनांक ११/२/२०२५

जाहीर प्रगटन देणार
टिळक बन्सीलाल राजपूत
मार्फत : ॲड ए बी पारधे लासुर नाका, गंगापुर

# अभ्यास करणे ही जगातील सर्वात सोपी गोष्ट - नितेश कराळे

## किसन काका कोल्हे यांच्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१२ फेब्रुवारी – कोणतीही गोष्ट करायची म्हणले की, कष्ट पडतात, माणूस ती गोष्ट करण्याचे टाळतो किंवा चालढकल करतो त्यामुळे त्याला यश मिळत नाही. मात्र तुमचा अभ्यास असेल तर तुम्ही कुठल्याही बाबीला सामोरे जाऊ शकतात त्यासाठी अभ्यास करणे ही सर्वात सोपी गोष्ट आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते तथा वर्धा येथील फिनिक्स अकॅडमीचे संचालक नितेश कराळे यांनी केले आहे.

शहरातील सरस्वती कॉलनीतील आनंदीबाई कोल्हे प्राथमिक विद्यालयात स्व. किसन काका कोल्हे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानाच्या कार्यक्रमात, उपस्थित विद्यार्थी व निमंत्रितांशी संवाद साधताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे यांची तर प्रमुख अतिथी म्हणून शंकर मोकासे, माजी नगरसेवक शिवकुमार जैस्वाल,ईसरार मेंबर, सुलतान भाईजी, युवराज बनकर, संतोष निकम, उद्धव पवार माजी नगरसेविका अलका जाधव प्रा. रंगनाथ लहाने,ड. कृष्णा जाधव,ड. उमेश वारे, सतिश नहीरे, संत तुकडोजी महाराज पतसंस्थेचे चेअरमन अरुण देशमुख, दिलीप मगर, किसन काकरवाल यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना नितेश कराळे म्हणाले की, आपल्या शिक्षणाचा उपयोग अन्याय, अत्याचारा विरोधात झाला पाहिजे. प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळणे दुरापास्त झाले आहे. म्हणून स्पर्धा परीक्षेकडे वळा. एकदा नापास झाल्याने आयुष्य संपत नाही. नेते होऊ नका मात्र नेत्यातील हलकट गुण अंगिकारा. अपयशी झालेला माणूसच तुम्हाला यशाची वाट दाखवू शकतो. जिवनात नेहमी इमानदार राहा, इमानदार माणसाला सर्वच घाबरतात. आपली ध्येये लहान ठेवू नका, मोठी स्वप्ने बघा. शेतकरी सर्वात मोठी रिस्क घेतो. आयुष्यात रिस्क घेतल्याशिवाय काहीच मिळत नाही. असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, शेतकरी सेनेचे बाबासाहेब मोहिते,प्रा. प्रकाश खेत्री यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, माजी नगराध्यक्षा तथा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा स्वाती कोल्हे आणि उद्योजक योगेश कोल्हे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

व्याख्यानानंतर स्व. किसन काका कोल्हे यांच्या स्मृतिदिनानिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात आले.

## इंडिया एनर्जी वीक २०२५ मध्ये सादर केले तंत्रज्ञान

नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी–२०४७ पर्यंत ऊर्जा स्वावलंबन आणि २०७० पर्यंत नेट झिरो म्हणजेच शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या भारताच्या दृष्टिकोनाशी आपली वचनबद्धता दृढ करत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टिकेएम) ने आज इंडिया एनर्जी वीक २०२५ मध्ये भाग घेतला. हा कार्यक्रम ११ ते १४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान दिल्लीत आयोजित केला जात आहे. इंडिया एनर्जी वीक (आयईडब्ल्यू) २०२५ हे स्वच्छ ऊर्जा उपाय सादर करण्यासाठी आणि ऊर्जा स्वावलंबन तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे व्यासपीठ आहे. ऊर्जा परिस्थिती, तंत्रज्ञान, उद्योगातील ट्रेंड आणि धोरणात्मक दृष्टीकोनांवर चर्चा व्हावी म्हणून हा कार्यक्रम जागतिक राजकीय नेते, धोरणकर्ते, तज्ज्ञ आणि अंतिम उपभोक्त्यांना एकत्र आणतो

## भारतातील तरुणांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित

पुणे : : जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड असलेल्या विवोने त्यांच्या प्रमुख सीएसआर कार्यक्रम, विवो इग्नाइट: टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन इनिशिएटिव्ह (टी अँड आय इनिशिएटिव्ह) साठी सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल टेक्नॉलॉजी – एनसीईआरटी (सीआयईटी–एनसीईआरटी), आयआयटी मद्रास प्रवर्तक टेक्नॉलॉजीज फाउंडेशन आणि यूएन ग्लोबल कॉम्पॅक्ट नेटवर्क इंडिया (यूएन जीसीएनआय) सोबत भागीदारी केली आहे. या सहकार्यांमुळे टी अँड आयउपक्रमाला आणखी चालना मिळेल, जो भारतातील तरुणांना, विशेषतः इयत्ता ८–१२ मधील विद्यार्थ्यांना, नाविन्यपूर्ण उपायांद्वारे जगातील काही सर्वात गंभीर सामाजिक आव्हानांना तोंड देण्यासाठी संसाधने, मार्गदर्शन आणि व्यासपीठ प्रदान करून सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करतो.

## आन तिवारी 'वीर हनुमान' या मालिकेत बाल हनुमानाची भूमिका करणार

सोनी सब वाहिनी आपल्या 'वीर हनुमान' या आगामी पौराणिक मालिकेद्वारे प्रेक्षकांना भक्तीरसाचा आनंद देण्यासाठी येत आहे. ही भव्य मालिका प्रेक्षकांच्या मनात भक्तीभाव जागृत करून त्यांना आध्यात्मिक आनंद देईल. या मालिकेतील कलाकारांच्या संचात आन तिवारी या बालकलाकाराचे नाव दाखल होत आहे. प्रतिभावान आन बाल हनुमानाच्या भूमिकेत दिसणार आहे.आजवर काही मोठ्या मालिका आणि पौराणिक मालिकांमध्ये बाल शिवाच्या रूपात झळकलेल्या आनने खूप लहान वयात पडद्यावर आपली मोहकता दाखवली आहे. बाल हनुमानाचा खोडकरपणा, त्याची निरागसता आणि अढळ भक्ती तो पडद्यावर साकारताना दिसेल. त्याने साकारलेला हा बाल हनुमान सर्व वयोगटांच्या प्रेक्षकांना नक्कीच लोभस आणि आपलासा वाटेल.

## माता अंजनीच्या रुपात झळकणार सायली साळुंखे

'वीर हनुमान' या भक्तिरसपूर्ण मालिकेच्या माध्यमातून सोनी सब वाहिनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्यास सज्ज आहे. हनुमान ही आजही व्यापक प्रमाणात पूजली जाणारी देवता आहे. या मालिकेत हनुमानाचा प्रवास आणि त्याच्या जडणघडणीत केसरी आणि अंजनी या त्याच्या माता–पित्याची कशी महत्त्वाची भूमिका होती हे दाखवले जाणार आहे. प्रसिद्ध अभिनेत्री सायली साळुंखे या मालिकेच्या कलाकार संचात दाखल झाली असून हनुमानाच्या प्रेमळ मातेच्या महत्त्वाच्या भूमिकेत ती झळकणार आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १११/२०२५

अर्जदार : १) कलाबाई भ्र.भीमराव दाभाडे २) शामसुंदर भीमराव दाभाडे ३) मनोहर भिमराव दाभाडे ४) दिगंबर भीमराव दाभाडे अर्जदार नं. १ ते ४ रा. वडगाव रामपुरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५) पंचशिला भ्र.रावसाहेब दाणे, ६) व्दारकाबाई भ्र.भाऊसाहेब तुपे, रा.बाबरगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ७) संगिता भ्र.पोपट दाणे, अर्जदार नं. ५ व ६ रा. जांभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ८) वैशाली भ्र.बाळु खाजेकर, रा.गंगापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.जी. भोकरे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पती आणि अर्जदार नं. २ ते ८ यांचे पिता नामे भीमराव लक्ष्मण दाभाडे यांचा दि. १६/११/२०२४ रोजी मौजे वडगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत भीमराव लक्ष्मण दाभाडे यांना अर्जदार नं. १ ते ८ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत भीमराव लक्ष्मण दाभाडे यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १२/०२/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (व्हि.एन. काटकर) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र– २६६/२०२४

अर्जदार : १. इंदुबाई भ्र. पोपट सुर्यवंशी, वय ७८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. बेलखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद २. अशोक पिता पोपट सुर्यवंशी, वय–५२ वर्षे, धंदा मजुरी, रा. बेलखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. लताबाई भ्र. प्रकाश पाटील, वय ४७ वर्षे, धंदा – घरकाम, रा. निंभोरा ता. भडगांव जि. जळगांव

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे– जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी ॲड. एन. बि. थोरात कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की, मयत पोपट पिता चिंधा सुर्यवंशी हे अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील असुन अर्जदार नं. १ ही त्यांची धर्मपत्नी असुन अर्जदार नं. २ व ३ यांची जन्मदाती आई आहे. मयत पोपट पिता चिंधा सुर्यवंशा हे आजारपणाने दिनांक. १८.०९.२०२३ रोजी मौजे बेलखेडा येथे मयत झालेले आहे. मयत पोपट पिता चिंधा सुर्यवंशी यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. पोपट पिता चिंधा सुर्यवंशी हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, गांव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, विविध बँक राष्ट्रीयकृत बँकेच्या कामासाठी व ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ३ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन
दिनांक २२/११/२०२४

आदेशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाण्या न्यायाधीश क. स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा.ए.आय.आवटी दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि. किरकोळ अर्ज क्र. ८०/२०२५.
पुढील तारीख २१/०३/२०२५.

अर्जदार : १. सर्जेराव भ्र. गिरजाबा नलावडे, वय ७९ वर्षे, धंदा शेती, रा. रामनगर (वासडी), ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. एकनाथ पिता गिरजाबा नलावडे, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा. रामनगर (वासडी), ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. रमेश पिता गिरजाबा नलावडे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. रामनगर (वासडी), ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. नानाराव पिता गिरजाबा नलावडे, (मृत्यू दिनांक ०२/०२/२०१८) ४.१ सुरेखा भ्र. नानाराव नलावडे, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर (वासडी), ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.२ योगेश पिता नानाराव नलावडे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. रामनगर (वासडी), ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.३ नितेश पिता नानाराव नलावडे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. रामनगर (वासडी), ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.४ कोमल भ्र. संदीप राऊत, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बजाज नगर, एम.आय.डी.सी. वाळूज ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ५. कमलाबाई भ्र. दगडू सोनवणे, वय ७७ वर्षे, धंदा शेती, रा. घोडेगांव ता. खुल्ताबाद जि. औरंगाबाद. ६. सुभद्राबाई भ्र. अंबादास तिडके, वय ६९ वर्षे, धंदा शेती, रा. भाकरवाडी, ता. बदनापुर जि. जालना. ७. कस्तूराबाई भ्र. बाबुराव मालोदे, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा. खुल्ताबाद ता. खुल्ताबाद जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एन.एम. शेख यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, मयत गिरजाबा पिता नबाजी नलावडे हे दिनांक २८/०७/२००४ रोजी मौजे रामनगर ता. कन्नड येथे वृध्दपकाळाने मरण पावले असून मांडाबाई भ्र. गिरजाबा नलावडे ह्या सुद्धा दिनांक २१/०६/२०१६ रोजी मरण पावलेल्या आहेत. मयतास अर्जदार क्र. १ ते ४ मुले होते व आहेत. तसेच अर्जदार क्र. ५ ते ७ ह्या विवाहित मुली आहेत. ज्यापैकी अर्जदार क्र. ४ नानाराव गिरजाबा नलावडे हे दिनांक ०२/०२/२०१८ रोजी मरण पावलेले आहे. त्यास अर्जदार क्र. ४.१ पत्नी, अर्जदार क्र. ४.२ व ४.३ हे मुले असून अर्जदार क्र. ४.४. ही मुलगी विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र. १ ते ७ हे मयत गिरजाबा नबाजी नलावडे व मंडाबाई भ्र. गिरजाबा नलावडे काळजाणे यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदारांचे आणि मयतांचे मुळ आडनांव नलावडे असे असून हेच आडनांव काही ठिकाणी नरवडे तर काही ठिकाणी नलावडे असे नमूद झालेले आहे. अर्जदार क्रं. १ ते ७ यांना मयत गिरजाबा नबाजी नलावडे व मंडाबाई भ्र. गिरजाबा नलावडे यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, महानगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ७ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत गिरजाबा नबाजी नलावडे व मंडाबाई भ्र. गिरजाबा नलावडे हे मौजे रामनगर, ता. कन्नड येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ७ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१०/०१/२०२५ रोजी मौजे रामनगर ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०२/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक
दिवाणी न्यायधीश क. स्तर,कन्नड

### जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मेव्ही. डी. पाटील साहेब) क.स्तर यांचे कोर्टात**

पु.ता. २६/०३/२०२५
दि. किरकोळ अर्ज क. ७९/२०२५

अर्जदार : १. शेख शफीक पि.शेख रफीक उर्फ रफीयोद्दीन वय–७५ धंदा शेती रा.–खेडी (दिगांव) ता. कन्नड जि. औरंगाबाद ह. मु. मक्का मश्विद जवळ जमालशहा कॉलनी सिल्लोड ता. सिल्लोड जि. औरंगाबाद २. शेख रबीब पि.शेख रफीक उर्फ रफीयोद्दीन वय–५४ धंदा– शेती रा. – खेडी (दिगांव) ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. जोहर शाळेजवळ जोहर कॉलनी सिल्लोड ता. सिल्लोड जि. औरंगाबाद ३. महेरूनबी भ्र.शेख सोहेब वय–४४ धंदा घरकाम रा. खेडी (दिगांव) ता. कन्नड जि. – औरंगाबाद ४. आयनूरबी भ्र. शरीफ शेख वय–४२ धंदा घरकाम रा. खेडी (दिगांव) ता. कन्नड जि. – औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ ते ४ यांचे वडील मयत नामे शेख रफीयोद्दीन उर्फ रफीक पि.शेख चाँद यांचा मृत्यु दि. २२/१०/२००८ रोजी मौजे खेडी (दि.) ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून अर्जदार क. १ ते ४ यांची आई मयत नामे हशनुरबी भ्र. रफियोद्दीन उर्फ रफीक शेख हिचा मृत्यु दि. १६/१०/२०२४ रोजी मौजे खेडी (दि.) ता. कन्नड जि.औरंगाबाद येथे झाला आसुन मयतास केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत शेख रफीयोद्दीन उर्फ रफीक पि.शेख चाँद व हशनुरबी भ्र. रफियोद्दीन उर्फ रफीक शेख यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत शेख रफीयोद्दीन उर्फ रफीक पि.शेख चाँद व हशनुरबी भ्र. रफियोद्दीन उर्फ रफीक शेख यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्रह्य धरला जाणार नाही.

करीता आज दि. ११/०२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि. किरकोळ अर्ज क्र. ८१/२०२५.
पुढील तारीख २०/०३/२०२५.

अर्जदार : १. पांडूरंग पिता बाबुराव लोंढे, वय ७९ वर्षे, धंदा शेती, रा. बनशेंद्रा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. जनार्दन पिता बाबुराव लोंढे, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. बनशेंद्रा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह.मु. एफ ८६, शांती नगर, राहूल किराणा, अंबड ता. व जि. नाशिक. ३. विजलाबाई भ्र. काशीनाथ वाळुंजे, वय ८२ वर्षे, धंदा घरकाम, रा. आठेगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्याचे विधिज्ञ ॲड. एन.एम. शेख यांच्या मार्फत मा. न्यायलायात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे मयत बाबुराव शामराव लोंढे व मयत कौशल्याबाई भ्र. बाबुराव लोंढे यांचे लग्नसंबंधातून झालेले मुले असून अर्जदार क्र. ३ ही विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत बाबुराव शामराव लोंढे व मयत कौशल्याबाई भ्र. बाबुराव लोंढे यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील नामे बाबुराव शामराव लोंढे हे मौजे बनशेंद्रा, ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत बाबुराव शामराव लोंढे हे दि.२२/०१/२०२२ रोजी व अर्जदारांची आई मयत कौशल्याबाई भ्र. बाबुराव लोंढे ही दिनांक २२/१२/२०२१ रोजी मौजे बनशेंद्रा ता. कन्नड येथे वृद्धपकाळाने मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ यांना मयत बाबुराव शामराव लोंढे व मयत कौशल्याबाई भ्र. बाबुराव लोंढे यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत वाबुराव शामराव लोंढे व कौशल्याबाई भ्र. बाबुराव लोंढे हे मौजे बनशेंद्रा, ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक ११/०१/२०२५ रोजी मौजे वनशेंद्रा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०२/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक
दिवाणी न्यायधीश क. स्तर,कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि. किरकोळ अर्ज क्र. ३०/२०२५.
पुढील तारीख ०१/०३/२०२७,

अर्जदार : १. शांताराम पिता गोविंद घुगे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. कोळवाडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. गणेश पिता गोविंद घुगे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. कोळवाडी, ता. कत्रड जि. औरंगाबाद. ३. अनुसया भ्र. लक्ष्मण झाडे, वय ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. रोहिणी ता. चाळीसगांव जि. जळगांव ४. संगिता भ्र. गोरखनाथ डिगोले, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. राम नगर पोलिस कॉलनी, बिल्डिग नं. १, जालना

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एन.एम. शेख यांच्या मार्फत मा. न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे मयत गोविंद परभत घुगे व मयत सुलावाई भ्र. गोविंद घुगे यांचे लग्नसंबंधातून झालेले मुले अनून अर्जदार क्र. ३ व ४ ह्या मयताची विवाहित मुली आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ते ४ हे मवत गोविंद परभत घुगे व मयत सुलावाई भ्र. गोविंद घुगे यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त मयताम इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील नामे गोविंद परभत घुगे हे कोळवाडी ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत गोविंद परभत घुगे हे दि.११/०४/२०२३ रोजी कोळवाडी येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. तनेच अर्जदारांची आई मयत सुलावाई भ्र. गोविंद घुगे ही दिनांक १९/०८/२०२० रोजी मौजे कोळवाडी येथे मयत झाली आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ यांना मयत गोविंद परभत घुगे व यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयताचे वारस असल्यावावत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत गोविंद परभत घुगे हे मौजे कोळवाडी, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क. १ ते ४ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक ११/१२/२०२४ रोजी मौजे कोळवाडी ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्यावावत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वर्गर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैर मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक :१२/०२/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक
दिवाणी न्यायधीश क. स्तर,कन्नड

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पैठणला संत रविदास महाराज जयंती साजरी



पैठण दि १२ :- मानवतेची शिकवण देणारे थोर संत श्री शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची जयंती पैठणला मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी खंडोबा चौकातून संत रविदास यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात येऊन रविदास नगर येथील संत रविदास महाराज मंदिरात याची सांगता करत महाराज यांच्या संगमरवरी भव्य मूर्तीला अभिवादन करून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, माजी नगराध्यक्ष राजुभाऊ गायकवाड, शहराध्यक्ष जीतूभाऊ परदेशी,शालिवाहन पतसंस्थेचे चेअरमन किशोर चौव्हान,नगरसेवक बादशहा परळकर,किशोर तावरे,शहराध्यक्ष उमेश पंडुरे,पंचकमिटीचे अध्यक्ष एकनाथ शेळके,पत्रकार गौतमदादा बनकर,मंगलसिंग भवरे, गोरख शेळके, हेमंत भवरे, सुनील करवरे, गोवर्धन टाक,सतिष भवरे, दिनेश शेळके,किशोर भवरे, राजप्पा अण्णा,राहुल गारदे, मोतीलाल घुंगासे ,विजय गेहराव,मिठु नन्नवरे,शेकूजी लोहिया, जगदीश लोहिया,,रतन गारदे, उमेश शेळके, अजय गारदे, संजय शेळके, कैलास परदेशी,शुभम भवरे,हरिष गारदे,मयूर भेंडे,विजय भवरे,मंगेश शेळके, मुन्ना बांगरे,ओम गारदे, रितेश शेळके, थालू गारदे यांच्या सह मोठया संख्येने महिला भगिनी समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

## वसंत पंचमीच्या प्रवकालावर जगद्गुरु पट्टाभिषेक सोहळा संपन्न



सोयगाव,दि.१२ फेब्रुवारी : निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांचे उत्तर अधिकारी जगद्गुरु श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांना श्री क्षेत्र प्रयागराज येथील कुंभमेळ्यात श्री शंभू पंच दशनाम जुना खडा यांच्यावतीने व अखिल भारतीय आखाडा परीक्षेचे महामंत्री व श्री महंत हिरागिरीजी महाराजांच्या नेतृत्वात जुना पीठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर पूजापाद श्री स्वामी अवदेशानंदगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते वसंत पंचमीच्या प्रवकालावर जगद्गुरु पट्टाभिषेक सोहळा संपन्न झाला २४ वर्षांपूर्वी जगद्गुरु बाबांच्या कृपेने स्वामी शांतिगिरी महाराज यांचा प्रयाग्रज कुंभमेळ्यात महामंडलेश्वर म्हणून पट्टा अभिषेक झाला होता तर २०२५ च्या महा कुंभमेळ्यात पुन्हा याच पवित्र ठिकाणी जगद्गुरु म्हणून पट्टा विशेष झाला त्यानिमित्त दि.१० सोमवार रोजी सोयगाव शहरात व आमखेडा नगरीत भव्य दिव्य पालखी सोहळा संपन्न झाला.सर्व जय बाबाजी भक्त परिवार व गावकरी मंडळी यांनी आनंद उत्सव साजरा फटाक्यांची आतिषबाजी व प्रसाद ओम जनार्दनाय ओम शांतिगिरी नामाचा गजरात हजारो भाविक या सोहळ्यात पावली खेळून फुगडी खेळून सहभागी होऊन आनंद उत्सव साजरा करण्यात आला.जय बाबाजी जय महात्माजी या सोहळ्यात विशेष सहकार्य महामुनी अगस्त वारकरी संप्रदाय यांचे लाभले.हरिभक्त शरद महाराज,निवृत्ती मोहने महाराज, राहुल महाराज,जितेंद्र पंडित महाराज,बापूराव मानकर, सुरेश फूसे,कृष्णा शेलकर,शाम आगे,शंकर शिरसाट,ज्ञानेश्वर शिंदे,गोपाल बडगुजर,देवेंद्र पंडित,रमेश शेलकर,विजय पाटील,ज्ञानेश्वर नागपुरे,निलेश नागपुरे,भरत हिरे,ज्ञानेश्वर गव्हाड,वसंत आगे,शिवाजी जाधव,भारत दमदार,सुनील मालोदे,शांताराम सनसे,दगडू हिरे,हरीश सोहनी,सुनील वाघ, अमोल बागले,राजेंद्र म्हस्के,सह सर्व जय बाबाजी भक्त परिवार उपस्थित होते.

## देशातील सर्वोत्कृष्ट ३0 हेअरस्टायलिस्टमध्ये छत्रपती संभाजीनगर चा हेअरस्टायलिस्ट नितीन शेजवळ छत्रपती संभाजीनगर साठी अभिमानास्पद



छत्रपती संभाजीनगर , ११ फेब्रुवारी, २०२५: गोदरेज प्रोफेशनल स्पॉटलाइट या राष्ट्रीय पातळीवरील हेअरस्टायलिस्ट स्पर्धेत ऑथेंटिक सलून आणि कॅडमी (छत्रपती संभाजीनगर ) येथील नितीन शेजवळ हे टॉप तीस फायनलिस्टमध्ये निवडले गेले आहेत. ही छत्रपती संभाजीनगर साठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. केसांचा रंग तसेच केसांची निगा राखणारा गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लि. चा प्रमुख व्यावसायिक हेअर ब्रँड गोदरेज प्रोफेशनलने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हेअरस्टायलिस्टची हटके प्रतिभा ओळखणे तसेच त्यांच्या व्यावसायिक वाढीस समर्थन देणे हे गोदरेज प्रोफेशनल स्पॉटलाइटचा हेतू आहे.

मुंबईत झालेल्या या महाअंतिम फेरीत देशभरातून निवडलेले ३० प्रतिभावान सहभागी झाले होते. प्रत्येक फायनलिस्टने रॅम्पवर गोदरेज प्रोफेशनलच्या क्युरेटेड हेअर कलर कलेक्शनचे अत्यंत देखणे सादरीकरण केले. इतर २९ फायनलिस्टसह ग्रँड फिनाले इव्हेंटमध्ये सहभागी झालेल्या नितीन यांनी हेअरकलर्सचे उत्तम प्रदर्शन केले. ३० कुशल व्यावसायिकांच्या या पहिल्या तुकडीला यियान्नी त्सपाटोरी, गोदरेज प्रोफेशनलचे हेअरचे क्रिएटिव्ह डायरेक्टर, आदरणीय मार्गदर्शक शैलेश मूल्या, नॅशनल टेक्निकल हेड आणि नजीब-उर-रेहमान, गोदरेज प्रोफेशनलचे टेक्निकल अँबेसेडर यांच्या नेतृत्वाखाली मास्टरक्लासमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळाली.

अभिनव ग्रांधी, महाव्यवस्थापक, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड (ऋउझङ), म्हणाले, ६ दशलक्षाहून अधिक सलूनसह, भारताचा सलून उद्योग हा सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक आहे, तरीही प्रतिभावान हेअर स्टायलिस्ट दाखवण्यासाठी प्लॅटफॉर्मचा अभाव आहे. गोदरेज प्रोफेशनल स्पॉटलाइटला मिळालेल्या उदंड प्रतिसादासाठी आम्ही आनंदी आहोत. आम्हाला याचा अभिमान वाटतो. हे व्यासपीठ प्रतिभावान केशरचनाकारांना त्यांची सर्जनशीलता दाखवण्याची केवळ संधी देत नाही तर या क्षेत्रातील शिक्षण तसेच प्रशिक्षणाप्रती आमची बांधिलकी देखील दर्शवते. या उपक्रमाद्वारे, वाढत्या स्पर्धात्मक बाजारपेठेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि संधीसह हेअर स्टायलिस्टला सक्षम करण्याचे आमचे ध्येय आहे. भारतातील सलून व्यावसायिकांना संधी आणि त्यांची प्रगती करण्याच्या आमच्या दीर्घकालीन वचनबद्धतेच्या दिशेने हे आमचे एक पाऊल आहे.

# आधी मी कवितेला सांभाळले,आता कविता मला सांभाळत आहे-कवी अजीम नवाज राही



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१२ फेब्रुवारी ज्या घरात जन्मलो त्या घराला कसला शिक्षणाचा, पुस्तकाचा वसा,वारसा नसताना माय मराठीने कवितेने आणि वाणी ने मला राज्य आणि राज्याच्याही बाहेर अगदी देशाबाहेर ओळख मिळवून दिली.आधी मी कवितेला सांभाळले,आता कविता मला सांभाळत असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवी अजीम नवाज राही यांनी केले.आदर्श शिक्षक स्व.पी. डी.केवट गुरुजी यांच्या द्वितीय पूण्यस्मरण दीना निमित्त आयोजित कवितांचा स्फूर्तीदाई प्रवास या विषयावर स्व पूर्णाकाकू महिला प्रबोधिनी येथे मंगळवार दि.११ रोजी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे होते,तर प्रमुख अतिथी म्हणून नवोदयचे प्राचार्य पंकज देशमुख,विभागीय शिक्षण मंडळाचे सदस्य सागर जाधव, शिक्षसेनेचे राज्य सरचिटणीस दिपक पवार,ऍड प्रसन्ना पाटील, प्रा.शिवाजी हुसे,संपतराव केरे,डॉ.रमेश सूर्यवंशी,नगरसेवक रत्नाकर पंडित,संतोष निकम, सुधाकर देवकर,प्रा.अरविंद कांबळे,प्रा.रंगनाथ लहाने,बी एल कुंभकर्ण,ब्राम्हणकर सर, डॉ.यशवंत पवार,नवले आप्पा, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जेष्ठ साहित्यिक प्राचार्य रा.रं बोराडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.सूत्रसंचालन संजय जाधव,सचिन आहेर यांनी केले.प्रमुख पाहुणे व्याख्यात्यांचा विठ्ठल शिरसे यांनी अभ्यास प्रचूर असा परिचय करून दिला.

आपल्या बिकट,खडतर, संघर्षशील जडणघडणीच्या प्रवासाच्या रेशीमगाठी उलगडतांना अनेक विनोदी किस्से सांगून अजीम नवाज राही यांनी श्रोत्यांना खळखळून हसवलं, साध्यासोप्या भाषेतल्या त्यांच्या मनोगताने वाक्यागणिक टाळ्या एकवटल्या,तब्बल अडीच तास ओघवत्या,रसाळ,मधाळ शैलीच्या माध्यामातून अजीम नवाज राही यांनी व्याख्यानावर घेतलेली पकड समारोपीय वळणापर्यंत कायम राहिली. कार्यक्रमांतर्गत विभागीय शिक्षण मंडळाच्या सदस्यपदी निवड झालेले सागर जाधव,शिक्षकसेनेच्या राज्य कार्यकारणीत राज्य सरचिटणीस पदी नियुक्ती झालेले दिपक पवार,राज्य शासनाचा मानाचा डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार प्राप्त जेष्ठ साहित्यिक डॉ.रमेश सूर्यवंशी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी कालिदास उपासनी,भास्कररावं पंडित,धैर्यशील केरे,अनिल कोल्हे,नितीन पाटील,सचिन पुरी,राकेश निकम यांसह

शहरातील साने गुरुजी विद्यालय,काशिनाथरावं पाटील विद्यालय,आजूबाई शिक्षण संस्थेचे कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालयातील विद्यार्थी,शिक्षक, पालक पत्रकार,मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संरक्षण क्षमता महोत्सव - २०२५ चे आयोजन; शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

छत्रपती संभाजीनगर - सक्षम-२०२५ (संरक्षण क्षमता महोत्सव) हा एक महत्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे जो आपल्या देशाच्या ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी भारत सरकारने सुरू केला आहे.

जीवाश्म इंधनावरील व्यर्थ खर्चाला आळा घालणे, परकीय तिजोरीवरील वाढते ओझे कमी करणे आणि जीवाश्म इंधनांच्या ज्वलनामुळे निर्माण झालेल्या हरितगृह वायूच्या प्रतिकूल परिणामापासून पर्यावरणाचे रक्षण करणे हे या कार्यक्रमाचे अंतिम लक्ष्य आहे.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय तसेच तेल उद्योगाचे राज्यस्तरीय समन्वयक जनजागृतीकरण्यासाठी संबंधित राज्य सरकारच्या सक्रिय सहभागाने समर्थनासह विविध उपक्रम हाती घेतात..पेट्रोलियम उत्पादनांच्या संवर्धनासाठी, इंधन-कार्यक्षम उपकरणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पेट्रोलियम संवर्धनासाठी धोरणे आणि धोरणे प्रस्तावित करण्यात सरकारला मदत करण्यासाठी ींपणन कंपन्या (ओएमसी) आघाडीवर आहेत.



त्याच कळकळी ने सक्षम (संरक्षण क्षमता महोत्सव) २०२४-२५ हे१४ फेब्रुवारी २०२५ ते २८फेब्रुवारी, २०२५ दरम्यान आयोजित केले जातील, संपूर्ण देशभर ज्याची टॅगलाइन ग्रीन अँडक्लीन एनर्जीद्वारे क्लीन एन्व्हायर्नमेंट असेल (हरित आणि स्व च्छ ऊर्जेचे अंगिकार करा आणि पर्यावरणास स्वनच्छग बनवा)१४ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंततेल विपणन कंपन्या (ओएमसी) राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माणकरण्यासाठी आणिशाश्वतविकास आणि पर्यावरणसंरक्षणासाठी वर्तनात्मक बदलांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवतील.याचाच एक भाग म्हणून, महाराष्ट्रातील तेल उद्योग १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता वाय.बी. चव्हाण सेंटर, रंग स्वरहॉल, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००२१ येथे उद्घाटन समारंभाचे आयोजन करत आहे.

या पंधरवड्यात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा / वादविवाद, महाविद्यालयांमध्ये ग्राफिटी / भिंतीचित्रस्पर्धा, इंधनकार्यक्षम ड्रायव्हिंगस्पर्धा, लेखलेखन, पत्रकार परिषदा आणिटीव्ही / रेडिओवरील टॉकशो असे विविध उपक्रम राबवले जातील. सक्षम मोहिमे दरम्यान ओएमसी, शालेय मुले, तरुण,एलपीजी वापरकर्ते, ड्रायव्हर्स/फ्लीटऑपरेटर, उद्योग कर्मचारी/कामगार, शेतकरी, निवासीसंस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्थाइत्यादी विविध मोठ्या वर्गांपर्यंत पोहोचतील आणि इंधन संवर्धना चे महत्त्व, फायदे आणि पद्धतींबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी आणि इंधन-कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधनसंवर्धन उपक्रम राबविले जातील. अशी माहिती पत्रकार परिषद दरम्यान नितीन बजाज, शशांक तिवारी, सचिन साळुंखे यांनी दिली.

## जैन साधू-संतांसाठी लोकसहभागातून उभारणार त्यागी भवन' संभवनाथ दिगंबर मंदिर वर्धापनदिनी संकल्प

छत्रपती संभाजीनगर : जैन समाजात तीर्थकरांच्या भक्तीसोबतच साधूसंतांच्या सेवेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळेच मंदिराइतकेच महत्त्व संतांसाठी त्यागी भवनला आहे. बजाजनगरातील संभवनाथ मंदिरात त्यागी भवन निर्माण केले जात आहे. संभवनाथ दिगंबर जैन मंदिराचा १३वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. या वेळी लोकसहभागातून त्यागी भवन उभारणीचा संकल्प करण्यात आला. यानिमित्ताने धर्म ध्वजारोहण मिरवणूक काढण्यात आली होती. संभवनाथ भगवंतांची मूर्ती पालखीत ठेवण्यात आली होती.



गावाच्या राशीवरून ठरते तीर्थंकरांची स्थापना येथे तिसरे तीर्थकर भगवान संभवनाथ यांची स्थापना केली आहे. प्रत्येक मंदिरात कोणत्या तीर्थकरांची स्थापना होईल हे त्या गावाच्या राशीवरून ठरते. सुवीरसागर महाराजांनी ही स्थापना केली आहे, असे सचिव सुजित गोधा यांनी सांगितले.

मूर्ती विराजमान करण्याचे मान अनिता महावीर कासलीवाल इंद्र इंद्राणी व शांति मंत्र श्रीमती संगीता, स्विटी कार्तिक गंगवाल. जल अभिषेक व दूध अभिषेक सो कल्पना डॉ दिलीप कुमार जी अक्षय चुडिवाल सर्व औषधी डॉ विशाल अजित काला अर्चना फल सुशीला अभय कुमारजी पापडीवाल मंगल आरती जीवन गंगवाल यान मिळाला यावेळी तुषार, विजय, सौ.कनकमाला, सौ. समता, यशस्वी, अधिराज साहुजी परिवार जामखेडकर व समस्त दिगंबर जैन समाज बजाजनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आला

श्री विद्यासागर महाराज जी आरती व अघ चढायचे मान सम्यक गार्डन महिला मंडळ यांना मिळाला कायकम यशस्वी करयासाठी अध्यक्ष डॉ राजेंद काला, सचिव सुजित गोधा, उपाध्यक्ष अतुल चुडीवाल, कोषाध्यक्ष सुदेश अजमेरा, सदस्य दिपक काला, महावीर पाडे, सचिन पाटणी, योगेश कासलीवाल, सुनिल पांडे, जीवन गंगवाल खुशाल पाटनी नितीन शहा कैलास, यांच्यासह सल्लागार डॉ.सुरेश बडजाते, रविंद्र ठोले व सकल जैन समाज बजाजनगर, पंढरपुर, वाळुज, सिडको महानगर १ यांची केले.

## वर्ल्ड बुक फेअर' सारखे कार्यक्रम लोकोपयोगी आहेत: आचार्य बाळकृष्ण

पतंजलीने योग-आयुर्वेदाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा दिली. आयुर्वेद स्वतंत्र आहे, त्याची कोणाशीही स्पर्धा नाही: आचार्य बाळकृष्ण वर्ल्ड हर्बल एनसायक्लोपीडिया आणि सौमित्रयनिदानम, आयुर्वेदाचा महान ग्रंथ: आचार्य बाळकृष्ण. पतंजलीची स्वदेशी उत्पादने गुणवत्ता आणि शुद्धतेच्या सर्व मापदंडांची पूर्तता करतात, आमच्यासाठी देश हा व्यवसाय नाही, तो कुटुंब आहे: आचार्य बाळकृष्ण. पतंजलीने योग, आयुर्वेद, संशोधन, शिक्षण, वैद्यकीय आणि प्रेरणादायी आध्यात्मिक पुस्तके आणि ग्रंथ प्रकाशित केले. नवी दिल्ली, ०८ फेब्रुवारी: नॅशनल बुक ट्रस्ट, भारत (भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत) भारत मंडपम, प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे आयोजित जागतिक पुस्तक मेळाव्यात पतंजली योगपीठाचे सरचिटणीस आचार्य बाळकृष्ण प्रमुख वक्ते म्हणून म्हणाले की, 'जागतिक पुस्तक मेळा' सारख्या घटना सार्वजनिक साहित्यात प्रवेश करण्यायोग्य आहेत. ते म्हणाले की, पतंजलीने योग-आयुर्वेदाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. योगाबद्दल आचार्यजी म्हणाले की, आज जगभरात योगाचा स्वीकार झाला आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. जगभर वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांना एखाद्या शब्दाचा अर्थ सारखाच माहीत असेल तर तो योग आहे. जरी एखाद्याला योगाचा व्यापक आणि खोल अर्थ माहित नसला तरी, हे काही श्वासोच्छवासाचे व्यायाम, शारीरिक व्यायाम, काही आसने आणि प्राणायाम बद्दल आहे हे माहित आहे. आयुर्वेदाच्या संदर्भात ते म्हणाले की, आयुर्वेदाला आयुर्वेद म्हणून प्रस्थापित करण्यासाठी जागतिक स्तरावर जे काम व्हायला हवे होते, ते प्रत्यक्षात झाले नाही. ते म्हणाले की, आयुर्वेद हे एक पूर्ण शास्त्र आहे. आयुर्वेद स्वतंत्र असून त्याची कोणाशीही स्पर्धा नाही. ते म्हणाले की, लोपॅथी दैनंदिन जीवनात कृत्रिम औषधाच्या रूपात आहे. आयुर्वेद आपल्या जीवनात रुजलेला आहे तर लोपॅथी ही सक्ती आहे. आयुर्वेदाकडे वैद्यकशास्त्र किंवा वनौषधींचे शास्त्र म्हणून व्यापक दृष्टीकोनातून पाहिल्यास त्यासाठी अधिक कामाची गरज आहे. ते म्हणाले की, निसर्गाशी सुसंगत पदार्थांचा वापर करून निसर्गाशी सुसंगत जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे आयुर्वेद शिकवतो. आचार्यजींनी सांगितले की पतंजलीने जागतिक हर्बल एनसायक्लोपीडियाच्या रूपात एक महान पुस्तक प्रकाशित केले आहे ज्यामध्ये ३२ हजार औषधी वनस्पतींचे सचित्र वर्णन आहे. यापूर्वी केवळ १२ हजार औषधी वनस्पतींची माहिती उपलब्ध होती. याशिवाय सौमित्रयनिदानम् हा आयुर्वेदावर आधारित ग्रंथ आम्ही प्रकाशित केला, त्याद्वारे नवयुगाचाराच्या अनुषंगाने जगात उद्भवणारे नवीन रोग, नवीन व्याधी आणि नवीन रोगांचे स्वरूप, लक्षणे आणि निदान सादर करून एक आव्हानात्मक कार्य केले आहे. यामध्ये शरीराच्या रचनेच्या आधारे १४ विभागांमध्ये ६८२१ श्लोकांमध्ये ४७१ मुख्य रोगांसह सुमारे ५०० रोगांचे सचित्र वर्णन आहे. तसेच, आयुर्वेदाच्या परंपरेत प्रथमच २५०० हून अधिक क्लिनिकल परिस्थितींचे वर्णन पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. पतंजलीच्या स्वदेशी उत्पादनांबाबत ते म्हणाले की, पतंजलीच्या उत्पादनांची निर्मिती हीच दृष्टी समोर ठेवून करण्यात आली आहे. आम्हाला माहित आहे की आमचे कुटुंब त्यांचे सेवन करत आहे. म्हणूनच आमची उत्पादने गुणवत्ता आणि शुद्धतेच्या सर्व मानकांवर खरी राहतात. आपल्यासाठी देश हा व्यवसाय नसून कुटुंब आहे. त्यांनी सर्व उत्पादक कंपन्यांना आवाहन केले की ते जे काही उत्पादने बनवतात ते त्यांच्या कुटुंबाला लक्षात ठेवून बनवावे. तरुणांना संबोधित करताना आचार्यजी म्हणाले की, जे काही काम तुम्ही स्वत:साठी किंवा देशासाठी करत आहात, ते फक्त आजसाठीच नाही तर भविष्यात त्यांना त्या कामाचा कसा फायदा होईल याचा विचार करून करा. आचार्य जी म्हणाले की पतंजलीच्या माध्यमातून आम्ही योग, आयुर्वेद, शिक्षण, वैद्यक, संशोधन, प्राचीन हस्तलिखित पुस्तके आणि प्रेरणादायी आध्यात्मिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. याशिवाय, भारतीय शिक्षण मंडळाअंतर्गत इयत्ता १ ते इयत्ता १० वी पर्यंतचा अभ्यासक्रम देखील देशी शिक्षण पद्धतीचा पाया घालत प्रकाशित केला जात आहे.



## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (३८) प्रार्थना (३)

समुत्कर्ष निःश्रेयस्यैकमुम्र परं साधनं नाम वीरव्रतम् तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम्। विजेत्री च नः संहता कार्यशक्तिर् विधायास्य धर्मस्य संरक्षणम् परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्र समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ।३।

अर्थः- उच्च असे आध्यात्मिक सुख आणि महानतम अशी ऐहिक समृद्धी प्राप्त करण्याचे एकमेव श्रेष्ठतम असे साधन असलेली उग्र अशी वीरव्रताची भावना आमच्यात सदैव उत्स्फूर्त होत राहो. तीव्र आणि अखंड अशी ध्येयनिष्ठा आमच्या अंतःकरणात सदैव जागती राहो. तुझ्या कृपेने आमची ही विजयशालिनी संघटित कार्यशक्ती आमच्या धर्माचे संरक्षण करून या राष्ट्राला वैभवाच्या उच्चतम शिखरावर पोहोचवण्यास समर्थ होवो.

।। भारत माता की जय ।। क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## सोयगाव तालुक्यात वन व्यवस्थापन समित्या कागदावरच;-सात वर्षांपासून वन समित्यांचे पुनर्गठन नाही : वरिष्ठांचे होतेय दुर्लक्ष

सोयगाव,दि.१२ फेब्रुवारी - सोयगाव सह तालुक्यातील ग्रामीण भागात ग्रामपंचायतींना वनविभागाने पत्रच न दिल्याने सात वर्षांपासून ग्रामीण भागातील वन समित्या जैसे थे आहे त्यामुळे ग्रामीण भागात अवैध वृक्ष तोड मोठ्या प्रमाणात फोफावली आहे.

वन विभाग, महसूल, वन मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत जंगलाचे वनसंवर्धन व वन संरक्षण व्हावे तसेच वनविभागाच्या सहकार्याने जंगलाची देखरेख म्हणून ग्रामस्थांसह वन विभागाने वन व्यवस्थापन समितीचे गठण केले आहे. परंतु, गेल्या सात वर्षांपासून सोयगाव सह तालुक्यात अजूनही नवीन वन व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात आले नाही.शासन निर्णयाप्रमाणे वन व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ हा पाच वर्षाचा असतो. परंतु, सन २०१७ ते २०१८ पासून जुन्याच वन व्यवस्थापन समित्या कार्यरत आहेत. ग्रामीण भागात, काही वन व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष, पदाधिकारी यांना वनविभागाने कोणतेही अधिकार दिलेले नसून या जुन्या वन समित्याना विश्वासात घेत नसल्याचे आरोप वन समिती अध्यक्ष यांनी केले आहे त्यामुळे वनविभागाचे वृक्षतोडीकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. वन व्यवस्थापन ग्रामपंचायतीच्या समिती ग्रामसभेच्या माध्यमातून वन व्यवस्थापन समितीचे गठण करते. मात्र, सात वर्षापासून आजही जुन्याच वनव्यवस्थापन समित्या कार्यरत आहेत. नव्याने समिती गठीत करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.याबाबत मात्र वनविभाग उदासीन दिसून येत आहे....

## सोयगाव शहरातील अजिंठा व्हॅली इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न




सोयगाव,दि.११ फेब्रुवारी : सोयगाव शहरातील अजिंठा व्हॅली इंग्लिश स्कुलचे शनिवारी सायंकाळी सहा वाजता वार्षिक स्नेह संमेलन सुरु झाले यावेळी गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव, सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गणेश झलवार,प्रकल्प अधिकारी सविता सैवर,समाज सेवक संजय शहापूरकर,भास्कर पिंगालकर,डॉ. दिनकर पिंगालकर,डॉ.स्वाती पिंगालकर संस्थेचे मुख्याध्यापक रुपाली मानकर आदींची उपस्थिती होती.यावेळी पोलीस उपनिरीक्षक गणेश झलवार,संजय शहापूरकर,सविता सैवर यांच्या हस्ते स्नेह संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. उदघाटन प्रसंगी मुलांना व मुलींना पालकांनी व आईंनी मोबाईल व टी व्ही च्या रिमोट पासून दूर ठेवण्याचे आवाहन केले या स्नेह संमेलनात २८ विविध पथ नाट्य,नाटिका,पोवाडे, व गाण्यांचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी पहिली ते सातवी च्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज,यांच्या जीवनावर आधारित पोवाडे सादर केले. यावेळी मुख्याध्यापक रुपाली मानकर,रंजना जाधव,सीमा भामरे,मिनाक्षी रोकडे,सोनाली बागुल,पूजा दामदार,प्रियंका रोकडे,शितल तेलंगरे,रुपाली गोलारे,भास्कर पिंगलकर,डी. बी.पिंगलकर,डॉ.स्वाती पिंगलकर,रुपेश बनसोडे आदींनी पुढाकार घेतला होता.

## एककल्ली धार्मिक उन्माद आणि भारतीय संविधान या विषयावर अश्विनकुमार उपाध्याय यांचे १६ फेब्रुवारीला व्याख्यान



छत्रपती संभाजीनगर : देशातील नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात कलम ३७० कलम ३५ A, Waqf Act Places of Worship Act यासारख्या २०० जनहित याचिका दाखल करणारे पी.आय.एल मॅन सुप्रीम कोर्टातील प्रतिथयश वकील मा.श्री अश्विन कुमार उपाध्याय यांचे राष्ट्रहित जनाधार विश्वस्त मंडळातर्फे कै. जनुभाऊ रानडे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून एककल्ली धार्मिक आणि भारतीय संविधान या विषयावर रविवार दिनांक १६ फेब्रुवारीला सायंकाळी ६.३० वाजता तापडिया नाट्य मंदिरात व्याख्यान ठेवले असून या व्याख्यानाला पूजनीय भास्करगिरी महाराज देवगड संस्थान यांचे आशिर्वचन लाभणार आहे आणि विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांताध्यक्ष संजय आप्पा बारगजे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या व्याख्यानाला मोठ्या संख्येत उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रहित जनाधार विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव शेरकर आणि सचिव राजीव जहागिरदार यांनी केले आहे.

## आपेगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी वैजनाथ औटे बिनविरोध



पैठण दि १२ : श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे जन्मगाव असलेल्या आपेगाव ग्रामपंचायत याठिकाणी उपसरपंच पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली यावेळी नऊ पैकी आठ ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.याप्रसंगी उपसरपंच पदी वैजीनाथ लक्ष्मण औटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.निवडी करता मंडळ अधिकारी चित्रा धाडेकर व ग्राम विकास अधिकारी वसंत इंगळे यांनी काम पाहिले.औटे यांची बिनविरोध निवड होताच सरपंच पोपटराव औटे यांच्यासह नवनियुक्त उपसरपंच वैजनाथ औटे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य वशीम गफार शेख,केसरबाई बनाजी औटे,सोमनाथ रावसाहेब औटे,वैशाली पांडुरंग औटै,राधाबाई भगवान कोल्हे,शोभाबाई आबासाहेब औटे यांच्यासह गावांतील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. धानोरकर यांच्या क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

छत्रपती संभाजीनगर - क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांकरीता ७ कलमी कृती आराखडा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याअनुषंगाने सोमवार दि.१० व मंगळवार दि.११ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी गंगापूर तालुक्यातील आरोग्य केंद्र व तालुकास्तरीय कार्यालयांना भेटी दिल्या.

## अग्रलेख...

# परीक्षेचा काळ रणकंदन ठरू नये म्हणून...

गेल्या ७५ वर्षांत ज्या विषयांना कोणत्याही पंतप्रधानाने साधा स्पर्श केलेला नाही, अशाही विषयांत पुढाकार घेणारे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन हे या देशाची धुरा किती समर्थ आणि संवेदनशील हातांमध्ये आहे, याचे प्रतीक मानले पाहिजे. राजकारण, सत्ताकारण, नोकरशाही, धोरणात्मक निर्णय, देशांच्या सीमा, आंतरराष्ट्रीय संबंध यांतच सत्तेतले लोक गुंतलेले असतात. मात्र, विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहे, हे ओळखून त्यांच्याशी संवाद साधण्यावर पंतप्रधान सतत भर देतात. थेट विद्यार्थ्यांना भेटतात, त्यांच्याशी चर्चा करतात. आता परीक्षांचा मोसम सुरू झालेला आहे. दहावी, बारावी, नीट अशा अनेक परीक्षा सुरू झालेल्या आहेत किंवा होणार आहेत. परीक्षेच्या काळात घरांमध्ये एक विचित्र प्रकारचा ताण असतो. विद्यार्थ्यांच्या मागे सतत अभ्यास-अभ्यास असे टुमणे आईवडील लावत असतात. त्यावरून राजी-नाराजी, रुसवे-फुगवे असे सारे प्रकार घडतात. परीक्षेत आपण पास होणारच नाही, असे वाटल्यावरून घर सोडणारे, आत्महत्या करणारे विद्यार्थी असतात. निकालानंतर आपण नापास झालो तर आपल्याला जगण्याचा अधिकार नाही, असे वाटल्यावरून जीव द्यायला निघालेले विद्यार्थीही आपण साऱ्यांनी पाहिलेले आहेत. खरे तर माणसाचे संपूर्ण जीवन हीच परीक्षा असेल तर एका परीक्षेला एवढे महत्त्व देण्याचे कारण नाही. त्यामुळेच पंतप्रधानांनी, परीक्षेचा ताण न घेता अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. भीतीवर विजय मिळवा, असा सल्ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. त्यांचे आवाहन लक्षात घेतले तर कोणतीही परीक्षा ही जीवनाहून, जगण्याहून महत्त्वाची नसते, हे कुणालाही पटावे. तरीही अनेक पालकांना आपला मुलगा किंवा मुलगी सर्वांहून पुढेच गेली पाहिजे, असा ध्यास लागलेला असतो. या ध्यासाला तसा कोणताही तार्किक आधार नाही. प्रत्येक मूल आपापली परिस्थिती, आपापली बुद्धिमत्ता, आपापली क्षमता, आपापले आकलन, आपापली मांडणीची पद्धत घेऊन जन्माला येते आणि आपल्या कुवतीनुसार व वाट्याला आलेल्या परिस्थितीनुसार विकसित होत असते. त्यामुळेच एकाच वर्गातील, सारख्याच शिक्षकांच्या मार्गदर्शनात तयार झालेल्या मुलांना वेगवेगळे गुण मिळतात. एखादे समंजस घर वगळले तर सर्व घरांमध्ये मुलांना-विद्यार्थ्यांना अव्वल येण्याचा आग्रह धरला जातो. आपली मुले शिकून मोठी झाली पाहिजेत, असे वाटण्यात गैर नाही. मात्र, मुलांवर आपण आपले अट्टहास लादले तर त्यांची मानसिकता कमकुवत होण्याची आणि त्यातून नवे प्रश्न उद्भवण्याची शक्यता असते, हेही पालकांनी लक्षात घेतले पाहिजे.

परीक्षा हा शैक्षणिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे, यात वाद नाही. भविष्यातील संधींची प्रवेशद्वारे परीक्षांच्या माध्यमातून उघडतात. एकेकाळी मूल्यांकनाचे साधन असलेली परीक्षा आता रणांगणात रूपांतरित झालेली दिसते. परीक्षेचा हंगाम जवळ येताच, विद्यार्थ्यांमध्ये आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेची भावना निर्माण होते. अपयशाची भीती, सामाजिक अपेक्षा आणि उज्ज्वल भविष्य मिळविण्याचे ओझे यामुळे विचित्रसे वातावरण निर्माण होते. मुलांना यशस्वी होताना पाहण्याची इच्छा असलेले पालक त्यांच्यावर प्रचंड दबाव आणतात. सतत अभ्यास करण्याची आठवण करून देणे, समवयस्कांची तुलना करणे आणि अवास्तव अपेक्षा ठेवणे यातून विद्यार्थ्यांच्या मनावर ताण येतो. यासंदर्भात सर्वांत महत्त्वाची बाब लक्षात घेतली पाहिजे की, जीवनातील यशाचा अंतिम निर्धारक म्हणून परीक्षांना दिले जाणारे महत्त्व अवाजवीच आहे. सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करावी किंवा समान शैक्षणिक टप्पे गाठावेत, अशी अपेक्षा गैर आहे. इतरांशी स्पर्धा करण्याकरिता मुलांवर दबाव आणण्याऐवजी पालकांनी त्यांच्या क्षमतेनुसार त्यांच्या आकांक्षा समजून घेण्याकडे आणि त्यांना पाठिंबा देण्याकडे लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक आहे. वर्षभरापूर्वी झालेल्या 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात एका विद्यार्थिनीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना परीक्षेच्या ताणाच्या संदर्भातील पालकांच्या भूमिकेबद्दल प्रश्न विचारला होता. त्यावेळी पंतप्रधान म्हणाले होते की, एकमेकांशी मोकळा संवाद करून या विषयावर मार्ग काढता येणे शक्य आहे. मुलांवर पालकांनी आणि पालकांवर मुलांनी विश्वास ठेवला पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिक असावे आणि पालकांनी आपल्या मुलांबाबत शंका घेण्यापेक्षा त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला पाहिजे, असेही पंतप्रधानांनी सांगितले होते. परीक्षेचा ताण कमी करण्यात शिक्षक व शैक्षणिक संस्थांच्या भूमिकेबद्दलदेखील त्यांनी ऊहापोह केला होता. शाळांनी पारंपरिक मूल्यांकन पद्धतींच्या पुढे जाऊन शिक्षणासाठी समग्र दृष्टिकोन स्वीकारले पाहिजेत, हा त्याचा मथितार्थ होता. विद्यार्थ्यांना आपल्या मनातील शंका व भीती यावर बोलताना कोणताही ताण येणार नाही, असे वातावरण शिक्षकांनी व पालकांनी निर्माण केले पाहिजे. त्यांनी इन्स्पेक्टर न बनता मार्गदर्शक म्हणून काम केले पाहिजे. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकदृष्ट्याच नव्हे, तर भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन केले पाहिजे. तसे होत नसल्यामुळे आज ही परिस्थिती उद्भवलेली आहे आणि पंतप्रधानांना, मुख्यमंत्र्यांना परीक्षेवर, ताणावर चर्चा करावी लागते आहे. एक प्रकारे परीक्षेच्या काळात निर्माण होणारा ताणाचा मुद्दा आता केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. ते एक सामाजिक आव्हान बनले आहे. वास्तवात शिक्षण हा निरंतर शोध, स्वतःच्या क्षमतांचा बोध आणि विकासाचा प्रवास असला पाहिजे. ती गुणांसाठीची शर्यत असता कामा नये. जीवनातील यशस्विता ही एका परीक्षेवर ठरत नसते. एकेकाळी मेरिट आलेले अनेक विद्यार्थी आता कुठे आहेत, याची माहिती घेतली तर त्यांच्याच वर्गातील सरासरी बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांनी त्यांना लौकिक जीवनातील यशाच्या बाबतीत मागे टाकले आहे, असे दिसेल. शेवटी जीवनातले यश हे एका व्यवसायापुरते मर्यादित नसते. ते नफा-तोटा किंवा अधिकाधिक संपत्ती जमवण्यातही नसते. पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनावर हे बिंबविले पाहिजे की, तुम्ही ज्या कोणत्या क्षेत्रात जाऊ इच्छिता, त्यात प्रचंड मेहनत करण्याची तयारी ठेवा म्हणजे नक्की यश मिळेल. होते असे की, आपला मुलगा किंवा मुलगी डॉक्टरच झाला किंवा झाली पाहिजे, त्याला-तिला अमक्याच कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे, तमक्याच कोर्सला मिळाला पाहिजे, असे आडाखे पालकांकडून तयार केले जातात. खाजगी कोचिंग संस्थांच्या जाहिराती यात भर घालणाऱ्या असतात. आमच्या संस्थेतून शिकलेल्या इतक्या विद्यार्थ्यांना मेडिकल कॉलेजेस किंवा आयआयटीजमध्ये प्रवेश मिळाल्याच्या जाहिराती ते करतात. विद्यार्थ्यांचे फोटो त्यात लावतात. पालकांच्या स्वप्नात आपल्या मुलाचा-मुलीचा फोटो असलेली जाहिरात दिसत असते. ते स्वप्न ते मुलांच्या डोक्यावर लादतात. त्यांची क्षमता असेल तर ठीक; पण नसेल तर तो किंवा ती त्यात यशस्वी होत नाही. परिणामी घरात रण माजते आणि विद्यार्थी निराश होतात. प्रत्येकाने डॉक्टर, सॉफ्टवेअर प्रोफेशनल किंवा इंजिनीअरच व्हायचे असेल तर हॉटेल्स कुणी चालवायचे, वेगवेगळे पदार्थ कुणी बनवायचे, गाणी कुणी लिहायची, ती म्हणायची कुणी, ती संगीतबद्ध करायची कुणी, वाद्ये कुणी वाजवायची, ती बनवायची कुणी, इंटेरियर्स कुणी करायचे, कलाकुसरीच्या वस्तू कुणी बनवायच्या, लेखक कुणी व्हायचे, कविता कुणी लिहायच्या, सिनेमा कुणी काढायचा, फोटोग्राफी कुणी करायची, लॅण्डस्केपिंग कुणी करायचे, चळवळी कुणी चालवायच्या, अकौन्टन्सी कुणी करायची, इमारतींचे डिझाईन्स कुणी बनवायचे याचा विचार तर करावा लागेलच ना! याचा अर्थ असा की, पालक जितका व जेवढा विचार करतात, तेवढेच मर्यादित विश्व जीवनातील यशासाठी उपलब्ध नाही. यशाची क्षेत्रे अमर्याद आहेत. त्यामुळे परीक्षेचा काळ हा युद्धाचा काळ असू नये, याची काळजी प्रत्येक घरात घेतली गेली पाहिजे. विद्यार्थ्यांचे मन कोवळे असते. त्यांच्याशी पंतप्रधानांना बोलावेसे वाटते. त्यांना काही गोष्टी समजावून सांगाव्याशा वाटतात. तसेच पालकांना आणि शिक्षकांनाही वाटले पाहिजे. तरच हा ताण कमी होईल आणि विविध क्षेत्रांतील विद्यार्थ्यांची प्रतिभा बहरेल.

## चिंतन

# भाजपाच्या त्सुनामीत 'आप' गेली वाहून...!

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

दिल्लीत आम आदमी पक्षाचा बालेकिल्ला ढासळला आहे. आतिशी वगळता पक्षाचे जवळपास सर्वच ज्येष्ठ नेते निवडणुकीत पराभूत झाले. यावेळी दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'ने सर्वांत वाईट कामगिरी केली. २०१५ मध्ये आम आदमी पक्षाने ६७ जागा जिंकल्या होत्या, पण २०२० मध्ये ही संख्या ६२ वर आली होती. त्याचवेळी भाजपाने २०१५ मध्ये केवळ ३ जागा जिंकल्या होत्या तर २०२० मध्ये ८ जागा जिंकण्यात यश मिळविले होते आणि आता बम्पर विजयासह २७ वर्षांनंतर दिल्लीत सरकार स्थापन करण्यात यश मिळविले आहे.

२७ वर्षांपूर्वी भाजपाच्या सुषमा स्वराज एकूण ५२ दिवस दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या आणि आता भाजपाने दिल्लीच्या सत्तेमध्ये जबरदस्त पुनरागमन केले आहे. भ्रष्टाचाराविरुद्धच्या चळवळीतून उदयास आलेल्या आम आदमी पक्षावर घोटाळ्याचे गंभीर आरोप होत असताना यावेळची विधानसभा निवडणूक हा आम आदमी पक्षासमोर मोठा प्रश्न होता; मात्र भाजपाने आम आदमी पक्षाला दिल्लीत विजय मिळविण्यापासून रोखले. अशा परिस्थितीत आम आदमी पक्षाच्या एवढ्या मोठ्या पराभवामागे मुख्य कारणे काय होती आणि पक्षाची राजकीय स्थिती इतकी कमकुवत का झाली, हा गहन चिंतनाचा विषय आहे. आप सरकारने जवळपास एक दशक दिल्लीवर राज्य केले. दीर्घकाळ सत्तेत राहिल्यामुळे जनतेमध्ये असंतोष आणि बदलाची इच्छा वाढली होती. विविध भागांत विकास कामांचा अभाव, पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष आणि आश्वासनांची पूर्तता न झाल्याच्या आरोपांमुळे सत्ताविरोधी लाटेला बळ मिळाले. परिणामी मतदार भाजपाकडे वळू लागले. अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील जनतेला यमुना स्वच्छ करणे, दिल्लीचे पॅरिससारखे रस्ते बनवणे आणि शुद्ध पाणी देणे अशी तीन प्रमुख आश्वासने दशकभरातही पूर्ण केली नाहीत. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, खासदार संजय सिंग इत्यादी पक्षाच्या प्रमुख नेत्यांवरील भ्रष्टाचाराचे आरोप आणि त्यांच्या अटकेमुळे पक्षाची प्रतिमा मलिन झाली आहे आणि आपची भ्रष्टाचारविरोधी प्रतिमा कमकुवत झाली आहे. विशेषत: केजरीवाल यांची अटक आणि त्यानंतर राजीनामा दिल्याने पक्षाच्या नेतृत्वात अस्थिरता आली आणि केजरीवाल यांच्या विश्वासार्हतेत मोठी घसरण झाली. केजरीवाल यांनी नेहमीच व्हीआयपी कल्चरवर प्रश्न उपस्थित केले होते; मात्र शीशमहलच्या मुद्यावर तेच 'व्हीआयपी कल्चर'च्या मुद्यावरून कोंडीत सापडले होते. भाजपा-काँग्रेसने या मुद्यावर आपला कोंडीत पकडण्यात कोणतीही कसर सोडली नाही.



राजकारणात येण्यापूर्वी केजरीवाल यांनी व्हीव्हीआयपी संस्कृती संपुष्टात आणणार असल्याचे सांगितले होते. त्यांनी कार, बंगला आणि सुरक्षा घेण्यासही नकार दिला होता, परंतु सत्तेत आल्यानंतर त्यांनी केवळ आलिशान गाड्या घेतल्या नाहीत, तर केंद्राकडून झेड प्लस सुरक्षा मिळूनही पंजाब सरकारकडून उच्च सुरक्षा घेतली.

पक्षातील अंतर्गत कलह आणि नेतृत्वाच्या मुद्यांमुळेही आपच्या पराभवाला मोठा हातभार लागला. अनेक ज्येष्ठ नेत्यांनी पक्ष सोडल्याने किंवा निष्क्रिय झाल्याने संघटनात्मक बांधणी कमकुवत झाली. याशिवाय नेतृत्वाबद्दल असंतोष आणि निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव यामुळे कार्यकर्त्यांच्या मनोबलावर परिणाम झाला आहे. आप सरकारने वीज, पाणी आणि इतर सुविधांमध्ये मोफत सेवांची घोषणा केली होती, परंतु विरोधकांनी ही 'गाजर संस्कृती' असल्याची टीका केली आणि आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असल्याचे वर्णन केले. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या समस्यांमुळे लोकांमध्ये नकारात्मक धारणा निर्माण झाली; ज्यामुळे आपची लोकप्रियता कमी झाली. दिल्लीत रस्ते, वाहतूक आणि स्वच्छता यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासात अपेक्षित प्रगती होऊ शकली नाही. याशिवाय प्रदूषण, पाणी साचणे, कचऱ्याचे ढीग यासारख्या समस्यांवर तोडगा न निघाल्याने केजरीवाल सरकारबद्दल लोकांमध्ये नाराजी वाढली आहे. दिल्लीतील 'आप'च्या लोकप्रियतेचे सर्वांत मोठे कारण म्हणजे मोफत वीज-पाणी यांसारख्या योजना मानल्या जात होत्या; मात्र निवडणुकीच्या वेळी भाजपानेही आपसारखीच रणनीती खेळली आणि आपल्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये महिला, लहान मुले, तरुण ते ऑटो रिक्षाचालक यांच्यासाठी मोठमोठ्या घोषणा तर केल्याच; सत्ता मिळाल्यास आपने चालवलेल्या सर्व योजना सुरू ठेवणार असल्याचेही जाहीर केले. भाजपाच्या या घोषणांमुळे आपची डोकेदुखी वाढली होती. विरोधकांची आणि विशेषत: भाजपाची मजबूत रणनीती आणि त्यांचा जोरदार प्रचार हे आपसाठी सर्वांत मोठे आव्हान ठरले. आप सरकारचा सर्व कमकुवतपणा उघड करण्यात भाजपाने सक्रिय भूमिका बजावली. आपला अनेक जागांवर सहज विजय मिळण्यापासून रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या काँग्रेसनेही या पद्धतीने तिकीट वाटप केले. भाजपाने सामाजिक आणि धार्मिक मुद्देही प्रभावीपणे मांडले, ज्यामुळे आपच्या समर्थनात मोठी घट झाली. निवडणुकीपूर्वी काँग्रेस आणि आप यांच्यात आघाडीची चर्चा होती; मात्र हरयाणा विधानसभेत या दोघांमध्ये आघाडी न झाल्याने दिल्लीतही दोन्ही पक्षांमध्ये आघाडी होऊ शकली नाही. त्यामुळे विरोधी मतांची विभागणी झाली आणि त्याचा थेट फायदा भाजपाला झाला. काँग्रेससोबत आघाडी न करण्याच्या निर्णयाने आपची धोरणात्मक कमजोरी उघड झाली आणि विरोधी ऐक्याचा अभाव स्पष्टपणे दिसून आला. दिल्लीतील मतदारांवरही याचा विपरीत परिणाम झाला. गेल्या दोन विधानसभा निवडणुकांत काँग्रेसला एकही जागा मिळाली नव्हती. मात्र यावेळी काँग्रेसच्या मतांची टक्केवारी वाढल्याने आपला नुकसान सहन करावे लागले आहे.

निवडणुकीच्या प्रत्येक सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला 'आपत्ती' म्हणून संबोधून भाजपा कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जनतेच्या फायद्यासाठी असलेल्या केंद्राच्या कल्याणकारी योजना दिल्लीत लागू होऊ न दिल्याने मतदारांमध्ये आपच्या लोकप्रियतेवर विपरीत परिणाम झाला. देशाला भ्रष्टाचारमुक्त करण्याच्या मोठमोठ्या घोषणांमध्ये दारू घोटाळ्यासारखे भ्रष्टाचाराचे प्रकरण, केजरीवाल यांची हुकूमशाही नेतृत्वशैली, त्यांची हट्टी वृत्ती यामुळे मतदारांचा केजरीवाल यांच्याबद्दल भ्रमनिरास झाला आणि भाजपा हा एक मजबूत पर्याय म्हणून पुढे आला. छठपूजेदरम्यान यमुना नदीतील विषारी फेसाची समस्या, आयुष्मान भारत योजना दिल्लीत लागू होऊ न देणे, मूलभूत सुविधांचा अभाव आदी मुद्यांमुळे जनतेमध्ये असंतोष वाढला आहे. या दुर्लक्षामुळे जनतेचा पाठिंबा आपकडून इतर पक्षांकडे वळला आणि त्याचा फटका आपला सहन करावा लागला. एकंदरीत केजरीवाल यांच्या कथन आणि कृतीमधली मोठी तफावत हे आपच्या पराभवाचे प्रमुख कारण होते. या मुद्यावर भाजपा आणि काँग्रेस या दोघांनीही आपला कोंडीत पकडले, ज्यामुळे भाजपाच्या त्सुनामीत आपचे नशीब वाहून गेले, उद्ध्वस्त झाले.

९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# काँग्रेसचा बुरखा टराटरा फाडला

तसे तर २०१४ पूर्वीपासूनच काँग्रेसचे तंत्र बिघडले होते. पण, नरेंद्र मोदी पहिल्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर ते आणखी बिघडले. मोदी दुसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यावर त्यात आणखी वाढ झाली. आता तर मोदींचा तिसरा कार्यकाळ पूर्वीच्या दोन कार्यकाळाइतकाच दमदारपणे सुरू असल्याने काँग्रेस पुरती बिथरली आहे. मागचा-पुढचा विचार न करता काँग्रेस वाटेल तो मुद्दा उपस्थित करून वेळोवेळी तोंडघशी पडते. याशिवाय त्यांना ६० वर्षांच्या सत्ताकाळात काय झाले, याचेही स्मरण करून दिले जाते. त्यातून काँग्रेसचा कुप्रसिद्ध इतिहास नव्या पिढीसमोर आपसूकच येत आहे. दिल्ली ते गल्लीपर्यंतचे काँग्रेसचे नेते सैरभैर झाले आहेत. पक्षांतर्गत उणिवा शोधण्याऐवजी भाजपावर आगपाखड करून स्वत:चे समाधान करण्यात धन्यता मानणाऱ्या काँग्रेसची स्थिती 'धूळ चेहऱ्यावर आणि स्वच्छता आरशाची' अशी झाली आहे. या स्थितीची जाणीव करून देणारे काही नेते अजूनही काँग्रेसमध्ये शिल्लक आहेत, पण त्यांचे ऐकण्याची मानसिकता वरिष्ठ नेतृत्वाची नाही. खोटे विमर्श तयार करून समाजात पसरवायचे आणि त्यातून भाजपा बदनाम होईल व आपल्याला त्याचा फायदा मिळेल, असा अत्यंत हलका फंडा काँग्रेसने हाती घेतला आहे. लोकसभेत त्याचा थोडा फायदा झाला, पण त्यानंतरच्या सर्वच विधानसभा निवडणुकांत काँग्रेसला सपाटून मार बसला. या फटक्यातूनही काँग्रेस सुधारायला तयार दिसत नाही, याची प्रचीती संसदेत येत आहे.

राज्यसभेतले भाजपाचे प्रतोद खा. अनिल बोंडे यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठरावाच्या बाजूने दमदार भाषण केले. आपल्या १५ मिनिटांच्या भाषणात त्यांनी काँग्रेसचा बुरखा टराटरा फाडला. विकसित भारताचा संकल्प असलेल्या राष्ट्रपतींच्या भाषणातल्या काँग्रेसने शोधलेल्या उणिवादेखील हास्यास्पद असल्याचे खा. बोंडे यांनी ठासून सांगितले. काँग्रेसने सूचना कराव्या, पण कोणाचा अपमान करण्याचा अधिकार त्यांना नाही. श्यामाप्रसाद मुखर्जींनी हिंदू कोड बिलाला विरोध केला, असा चुकीचा विमर्श काँग्रेस पसरविते. मुखर्जींनी हिंदू कोड बिलाला विरोध केला नाही; उलट त्यांनी सोबतच समान नागरी कायदा पारित करण्याची मागणी करून इतर धर्मातल्या महिलांना न्याय देण्याची भूमिका घेतली होती. मुखर्जींचे जम्मू-काश्मीरमधले ३७० कलम निष्प्रभ करण्याचे स्वप्न नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात पूर्ण झाले असून समान नागरी कायदादेखील होईल. इतर राज्यांत त्याची सुरुवात झाल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना काँग्रेसने कसा त्रास दिला, याची उत्तम मांडणी खा. बोंडे यांनी संदर्भासह केली. पहिल्या निवडणुकीत डॉ. आंबेडकर उभे असलेल्या मतदारसंघात ७८ हजार मते कशी अवैध ठरविण्यात आली. जयप्रकाश नारायण यांनी त्याला दुजोरा दिला होता, असे सांगून पंडित नेहरूंनी डॉ. आंबेडकरांविरोधात केलेल्या प्रचाराचा उल्लेख केला. इतकेच नाही तर दुसऱ्या म्हणजे १९५४ च्या निवडणुकीत डॉ. आंबेडकर भंडाऱ्यात उभे असताना त्यांना पराभूत करण्यासाठी पंडित नेहरूंनी सभा घेतल्या. त्याचवेळी रा. स्व. संघाचे दत्तोपंत ठेंगडी यांनी मात्र बाबासाहेबांच्या विजयासाठी प्रामाणिक प्रचार केला. काँग्रेसने ठरविल्यानुसार डॉ. आंबेडकरांना पराभूत केले आणि तेव्हापासून त्यांची प्रकृती सतत खालावली. त्यांना काँग्रेसने पदोपदी त्रास दिला, तो कोणीच विसरणार नाही. 'लिब्राडू' असा उल्लेख करत पुरस्कार परत करणाऱ्यांचा खा. बोंडे यांनी समाचार घेतला. जेव्हा काश्मिरी पंडितांवर अत्याचार होत होते, तेव्हा काँग्रेसप्रणीत ही टोळी कुठे गेली होती? 'महाकुंभात डुबकी लावून कोणाचे पोट भरणार?' या काँग्रेस नेत्याच्या वाक्याचा उल्लेख करत खा. बोंडे म्हणाले, पोट भरणार नाही हे सर्वांनाच माहीत असून आस्था आणि संस्कृतीचा महाकुंभमेळा प्रतीक आहे. अध्यात्मातून आत्मिक समाधान मिळत असल्यानेच कोट्यवधी हिंदू प्रयागराजमध्ये पोहोचले. सक्षमपणे उभ्या असलेल्या भारताचे ते बलस्थान आहे. महाकुंभातल्या दु:खद घटनेचे काँग्रेसने राजकारण केले. असेच हजसंदर्भात बोलण्याची हिंमत मात्र काँग्रेसवाल्यांची होणार का? असा चिमटा घेत त्यांनी काँग्रेसची पोलखोल केली. अभिभाषणावर भाजपाच्या ज्या सदस्यांनी आपली मते मांडली, त्या सर्वांनीच काँग्रेसचा बेगडीपणा चव्हाट्यावर आणला. काँग्रेस कशी पदोपदी भूमिका बदलते आणि देशातल्या नागरिकांना विभाजित करण्याचे षडयंत्र रचते, याची अनेक उदाहरणे सभागृहात देण्यात आली. खा. बोंडे यांच्या भाषणाची राज्यसभेचे नेते केंद्रीय मंत्री व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी प्रशंसा केली. खा. बोंडे नेहमीच देव-देश-धर्माच्या बाजूने बोलतात. राष्ट्रहित जोपासणारी त्यांची अनेक भाषणे काँग्रेसींचा समाचार घेणारी व बुरखा फाडणारी असतात.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# तैत्तिरीय उपनिषद - महर्षी वरुण भृगू पंचकोश संवाद

**प्रा. दिलीप जोशी**

दशोपनिषदातील शैक्षणिक संस्कार करणारा उपनिषद म्हणजे तैत्तिरीय उपनिषद आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अपेक्षित पंचकोश विकास याच उपनिषदातून घेतलेला आहे. हा उपनिषद म्हणजे भारतीय नैतिक, आध्यात्मिक आणि सर्वांगीण शिक्षणाचा मूलाधार आहे. 'तैत्तिरीय' असे या उपनिषदाचे नाव आहे. या नावात 'तित्तीर' शब्द आहे. त्यामुळे या उपनिषदाचे कर्ते ऋषी तैत्तिरी ऋषी आहेत; ज्यांचा उल्लेख अगदी महाभारतातसुद्धा आहे. म्हणून याला 'तैत्तिरीय उपनिषद' म्हणतात. या नावाबाबत एक कथा आहे.

योगीश्वर याज्ञवल्क्य हे महर्षी वैशंपायन यांचे शिष्य. शास्त्रार्थावरून गुरुशिष्यात मतभेद झालेत त्यामुळे गुरू वैशंपायन यांनी रागावून शिष्य याज्ञवल्क्यांना शिकविलेले वेदज्ञान ओकून टाकायला सांगितले. याज्ञवल्क्यांनी गुरुआज्ञा म्हणून वेद ओकायला सुरुवात केले. ते प्रचंड ज्ञान वाया जाऊ नये म्हणून तेथे उपस्थित काही ऋषींनी 'तित्तीर' नावाच्या पक्ष्याचे रूप धारण केले आणि याज्ञवल्क्यांनी ओकलेले वेद या तित्तीररूपी ऋषींनी आपल्या चोचीने ग्रहण केले. म्हणून या ऋषींना तित्तीर ऋषी म्हणतात. त्या तित्तीर ऋषींपासून यजुर्वेदाची तैत्तिरीय शाखा सुरू झाली. हे उपनिषद त्यातून निर्माण झाले म्हणून या उपनिषदाला तैत्तिरीय उपनिषद म्हणतात. या उपनिषदातील ज्ञान हे भारतीय शिक्षण पद्धतीचे नीलचित्र (ब्ल्यू प्रिंट) आहे. त्या काळात गुरुकुलात विद्यार्थी लहानपणीच जायचा. आईच्या गर्भातून जन्म घेतल्यावर तो गुरूंच्या गर्भात प्रवेश करायचा. म्हणून त्याला 'द्विज' (दोनदा जन्म घेतलेला) म्हणायचे. विद्यार्थी जेव्हा संपूर्ण शिक्षण पूर्ण करायचा, आताच्या भाषेत केजी ते पीजी पूर्ण करायचा, तेव्हा सर्व स्नातक विद्यार्थ्यांना प्रखर उन्हात माध्यान्ह समयी निरोप समारंभ असायचा. त्याला 'समावर्तन समारंभ' म्हणत असत. त्या प्रसंगी सद्गुरू आपल्या शिष्याने आजवर घेतलेल्या संपूर्ण ज्ञानाचे पुढील आयुष्यासाठी उजळणी अर्थात सिंहावलोकन करीत असत आणि तसा उपदेश करत असत. गुरूंनी केलेले असे आयुष्यभर उपयोगी असणारे शैक्षणिक मार्गदर्शन तैत्तिरीय उपनिषदात आहे.

या उपनिषदात तीन अध्याय ज्याला या उपनिषदात 'वल्ली' म्हणतात. वल्ली म्हणजे औषधीय वेल, जो मूळ वृक्षाच्या आधारावर असतो. भारतीय शैक्षणिक तत्त्वाची वल्ली जी भारतीय ज्ञान वृक्षावर आधारित आहे. या तीन वल्ली म्हणजे- १) शिक्षा वल्ली २) आनंद वल्ली ३) भृगू वल्ली. या तीन वल्ली मिळून एकूण ५३ मंत्र आहेत. या वल्लीचे अनुवाक असून ते ४० आहेत.

यातील शिक्षा वल्लीमध्ये युवा ब्रह्मचाऱ्यांना संबोधन असून ज्यात सद्गुरू आपल्या शिष्यांना सत्य बोलणे, धर्माचरण, चारित्र्यसंपन्नता, सद्गुण, जीवनाचे आदर्श प्रतिपादित करतात. आजीवन ज्ञानाचा शोध म्हणजे आयुष्यभर विद्यार्थी राहण्याचा सल्ला सद्गुरू देतात. यातील दुसरा अध्याय वल्ली म्हणजे आनंद वल्ली होय. या आनंदवल्लीत आत्मज्ञानातून परमानंद प्राप्ती सांगितली आहे. पंचकोश म्हणजे आत्म्याभोवतीची आवरणे यांची या वल्लीत चर्चा आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोश यांचा विकास म्हणजे व्यक्तिमत्त्व विकास आणि त्यातून ब्रह्मानंद अनुभूती असा आशय यात आहे.

पुढील वल्ली म्हणजे भृगू वल्ली. भृगू वल्ली शैक्षणिक विचारकांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ऋषी भृगू हे महर्षी वरुणांचे पुत्र आहेत. एक दिवस लहानसा भृगू आपल्या वडिलांना म्हणजे महर्षी वरुणांना प्रश्न करतात की, ब्रह्म म्हणजे काय? महर्षी वरुण त्याला ब्रह्म समजावून सांगतात, पण समजावून झाल्यावर आपला पुत्र आणि शिष्य असलेल्या भृगूला अनुभूती घेण्यासाठी वनात पाठवतात. भृगू वनात जाऊन तप:स्वाध्यायासाठी बसल्यावर काही कालावधीनंतर त्यांना अनुभूती येते. ते परत आपले गुरू आणि वडील महर्षी वरुण यांच्याकडे येऊन सांगतात.

अन्नं ब्रह्मेति व्यजानात। अन्नादब एव खल्विमानि भूतानि जायन्ते।
अन्नन्नेन जातानि जीवन्ति। अन्नं प्रयन्त्यभिसंविशंतीति ?

हे शरीर अन्नाचे बनलेले आहे. हा अन्नमय कोश ज्यापासून बनला ते अन्न म्हणजे ब्रह्म आहे. गुरू प्रसन्न होतात आणि म्हणतात अगदी बरोबर आहे. पण मला वाटते अजून तप:स्वाध्यायासाठी जा. तो पुन्हा जातो. काही काळानंतर त्याला पुन्हा अनुभूती येते. तो पुन्हा परत येऊन गुरूंना अनुभव सांगतो.

प्राणो ब्रह्मेति व्यजानात। प्राणादब एव खल्विमानि भूतानि जायन्ते।
प्राणेन जातानि जीवन्ति। प्राणं प्रयन्त्यभिसंविशंतीति?

या अन्नमय कोशाला ऊर्जा देणारा प्राण महत्त्वाचा आहे. हा प्राणमय कोश म्हणजे ब्रह्म आहे.

वडील पुन्हा समाधान व्यक्त करतात आणि त्याला पुन्हा अनुभूतीसाठी वनात पाठवतात. तो पुन्हा तप:स्वाध्याय करून अनुभूती घेऊन गुरूंकडे येतो तेव्हा तो म्हणतो...

मनो ब्रह्मेति व्यजानात। मनसो ह्यैव खल्विमानि भूतानि जायन्ते।
मनसा जातानि जीवन्ति। मनः प्रयन्त्यभिसंविशंतीति?

या सर्वांची अनुभूती मन घेते म्हणून मन हेच ब्रह्म. मनोमय कोशाबद्दल त्यांच्यात चर्चा होते. गुरू समाधान व्यक्त करून त्याला पुन्हा वनात पाठवतात तेव्हा तो पुन्हा तपस्वाध्यायनंतर येतो तेव्हा-

विज्ञान ब्रह्मेति व्यजानात। विज्ञानाद्वैव खल्विमानि भूतानि जायन्ते।
विज्ञानेन जातानि जीवन्ति। विज्ञान प्रयन्त्यभिसंविशंतीति?

त्याला विज्ञानमय कोश म्हणजे ब्रह्म वाटते. त्याचे वडील त्याला पुन्हा पाठवतात. तो तपःस्वाध्याय करतो. खूप दिवस झालेत आपला मुलगा परत आलाच नाही म्हणून महर्षी वरुण अंतर्ज्ञानाने पाहतात आणि जेव्हा भृगू ऋषींशी संपर्क करतात आणि पाहतात तर काय तर त्यांचा मुलगा भृगू ब्रह्मनंदात निमग्न दिसला. त्याला खऱ्या अर्थाने ब्रह्मज्ञान झालेले दिसले. त्याच्याशी ते अंतर्ज्ञानातच दूरस्थ संवाद करतात तेव्हा तो तेथूनच आनंदात सांगतो.

आनंदो ब्रह्मेति व्यजानात। आनंदाद्वैव खल्विमानि भूतानि जायन्ते।
आनंदेन जातानि जीवन्ति। आनंद प्रयन्त्यभिसंविशंतीति?

आनंदमय कोश त्याला उमगला होता. आनंदाचे डोही आनंद तरंग होते. आनंद हेच ब्रह्म हे तो गुरूंना आनंदातच सांगतो.

गुंतलो होतो अर्जुन गुणे। मुक्त जाहलो तुझिया गुणे
आता सांगणे पुसणे। काहीही न लगे। ज्ञानेश्वरी ?


जन्ममृत्यूच्या पलीकडला तो ब्रह्मानंद तो विराटपुरुष मी पाहिला आहे. पंचकोशाची विकासात्मक उकल मला ब्रह्मानंदापर्यंत घेऊन आली आहे. हा पंचकोश आपल्या जीवनाचा आनंदाचा मंत्र आणि मार्ग आहे. याशिवाय तैत्तिरीय उपनिषदात शिक्षावल्लीत सुप्रसिद्ध तत्त्व सांगितले आहे. ज्यावर आपली संस्कृती आजही टिकून आहे; ज्यामुळे मेकॅलोसारखे विदेशी अवैचारिक आक्रमक या संस्कृतीला हलवू शकले नाहीत ते म्हणजे 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, अतिथी देवो भव !' ही शिकवण आणि 'सत्यं वद, धर्मं चर' हे आपले पायाभूत तत्त्व तैत्तिरीय उपनिषदाचेच आहे.

९८२२२६२७३५

### रथसप्तमी आणि सूर्यनमस्कार

धार्मिक मान्यतेनुसार माघ शुक्ल पक्ष सप्तमीला रथसप्तमी म्हणतात. या दिवशी महर्षी कश्यप आणि देवी आदिती यांच्या पोटी सूर्यदेवतेचा जन्म झाला. श्री सूर्यनारायण भगवान श्री विष्णूचे एक रूपच आहे. आपले जीवन सूर्यदेवामुळेच अस्तित्वात आहे. म्हणूनच रथसप्तमीला सूर्यदेवतेची पूजा करून त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. हिंदू धर्मात सूर्यपूजेला फार महत्त्व आहे. रोज सकाळी सूर्याला अर्घ्य दिल्याने अंधाराचा नाश करून जग उजळून टाकण्याची शक्ती सूर्यात आहे. दरवर्षी मकर संक्रांतीला सुरू होणारा हळदीकुंकू समारंभ रथसप्तमीपर्यंत करण्याचा प्रघात आहे.

या पर्वाचे औचित्य साधून ठिकठिकाणी सामूहिक सूर्यनमस्कार यज्ञाचे आयोजन केले जाते. वरोडा येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या मैदानावर भव्य सूर्यनमस्कार करण्याचा विक्रम केला. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी, योगसाधकांनी श्री लक्ष्मी यंत्राच्या प्रतिकृतीमध्ये सूर्यनमस्कार सादर केले. किती विलोभनीय दृश्य असेल याची




आपण कल्पना करू शकतो. तसेच महिलांची खुर्चीवरील आसने, त्यानंतर म्हटलेले रामरक्षा स्तोत्र, सूर्याष्टक, महिषासुर मर्दिनी स्तोत्र हे कौतुकास्पद आहे. या सगळ्याला आपण प्रत्यक्षदर्शी नसलो तरी त्या भारावलेल्या वातावरणाची कल्पना येते. शिक्षकांची आणि आयोजकांची किती मेहनत असेल याची जाणीव होते. इतर शाळा आणि महाविद्यालये यांनीही प्रेरणा घेऊन असे उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास आणि शरीर सुदृढ होण्यास निश्चित मदत होईल.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

●● ●●

## वाचक पत्रे

### राम मंदिर रस्त्याची दुर्दशा

नागपूरच्या स्वावलंबी नगरातील राम मंदिर रस्त्याची अवस्था सध्या अतिशय दयनीय झालेली आहे. नुकतेच या डांबरी रस्त्याचे रूपांतर सिमेंट रस्त्यामध्ये झालेले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजू जवळपास एक फूट खाली असल्याने कार पार्क करण्याची समस्या उद्भवली आहे. स्वावलंबीनगरमधील नाल्यावरील पुलापासून भेंडे ले-आऊटपर्यंत सिमेंट रस्त्यावर दोन्ही बाजूला कार पार्क केलेल्या असतात. आता तर रस्ताच्या दोन्ही बाजूंना ड्रेनेज पाईप टाकण्याचे काम सुरू आहे. सिमेंट रस्त्यावर मोठाले पाईप, खोदून काढलेल्या मातीचे ढिगारे, गिट्टीचे उंच ढीग, जेसीबी आणि अवाढव्य ट्रक हजर आहेत. काम कासव गतीने सुरू आहे.


रस्त्यावरून पायी चालणे अत्यंत धोकादायक झालेले आहे. अतिशय वर्दळीचा रस्ता असूनही चारचाकी आणि दुचाकी वाहने वेगाने पळत असतात. श्रीराम मंदिरात नियमाने येणाऱ्या वरिष्ठ नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन यावे लागते. सकाळी फिरायला जाणारे या रस्त्याने जाण्याचे टाळतात. संबंधित विभागाने या समस्येचा त्वरित निपटारा करावा ही अपेक्षा.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

●● ●●

### प्रदूषणापासून तारणारी गोमाता!

ऑटोमोबाईल एक्सपोमध्ये 'मारुती सुझुकी' कंपनीने शेणाच्या ऊर्जेवर चालणारी एक कार प्रदर्शनात ठेवली होती. या कारमध्ये शेणाचा वापर केल्यामुळे ही गाडी इतर इंधनांच्या मानाने अतिशय कमी प्रदूषण करते असे निदर्शनात आले. आज जगाच्या पाठीवर मोठमोठ्या शहरांमध्ये प्रदूषण ही मोठीच समस्या म्हणून निदर्शनात येते. प्रदूषणामुळे लहान, मोठ्या सर्वांना श्वसनाचे विकार होत आहेत. विद्यार्थ्यांना प्रदूषणकाळात शाळा-महाविद्यालयात जाण्यास बंदी असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. परंतु आता शेणावर चालणारी गाडी आल्यामुळे शहरातील प्रदूषण कमी करण्याचा



सोपा मार्ग आपल्यासमोर उपलब्ध झाला आहे. जगाच्या तुलनेत आजही भारतात गोवंश मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सर्व देश भारताकडे आशादायी नजरेने बघत आहेत. ऋषिमुनींनी गोमातेचे महत्त्व हजारो वर्षांपूर्वी लिहून ठेवले आहे. आज त्याचा प्रत्यक्ष प्रत्यय गोमातेची हत्या करणाऱ्यांनासुद्धा या संशोधनाच्या माध्यमातून आला असेल. गोवंशाची सुरक्षा, संवर्धन आणि हत्याबंदी कायदा करणे ही काळाची गरज आहे. यांच्या शेणातील विनाप्रदूषणकारी ऊर्जा टिकवण्यासाठी देशात लवकरात लवकर संबंधित कायदा केंद्र सरकारने करण्याची विनंती आहे.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

●● ●●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विद्यार्थीनीवर अत्याचार ; तामसा बंद

## अखेर त्या नराधम मुख्याध्यापकावर पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १२ फेब्रुवारी**

एका मुख्याध्यापकाने शाळेतील अल्पवयीन मुलींवर गुंगीचे औषध देऊन अत्याचार केला. त्यानंतर मुलीला तुझा व्हीडिओ माझ्याकडे असल्याची धमकी देत वारंवार अत्याचार केला. यातून गर्भवती झालेल्या या मुलीला मुख्याध्यापकाने नांदेडला नेऊन तिचा गर्भपात केला असल्याची संताप जनक घटना तालुक्यातील तामसा येथील माध्यमिक शाळेत घडली. हदगाव तालुक्यातील तामसा येथील एका शाळेचा मुख्याध्यापक तथा



राजकीय नेत्याच्या जवळचा कार्यकर्ता असलेल्या राजूसिंह चौव्हाण याने नांदेडचे पोलीस प्रशिक्षण केंद्र दाखविण्याचा बहाणा करत एका अल्पवयीन विद्यार्थिनीला चारचाकी वाहनातून सोबत नेले. आणि पाण्यातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. हा प्रकार कुणाला सांगितल्यास तुझा बनवलेला व्हिडिओ व्हायरल करेल असे सांगून वारंवार विद्यार्थिनीवर बलात्कार करत होता. याचं बरोबर पीडित विद्यार्थिनी गरोदर राहिल्याने तिला जीवे मारण्याची धमकी देऊन अल्पवयीन विद्यार्थीनीचा गर्भपात केला आहे.

दरम्यान घडलेला प्रकार कुटुंबियांना लक्षात आला. यामुळे मुलीला विश्वासात घेऊन विचारपूस केल्यानंतर पीडित मुलीने घडलेला प्रकार घरच्यांना सांगितला. याचा सर्वांनाच धक्का बसला. आईच्या मदतीने पीडित मुलीने तामसा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी शिक्षक राजूसिंह चौहान याच्यावर पोस्को, अट्रोसिटीसह विविध कलमा अंतर्गत बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**घटनेचा निषेध तामसा शहर कडकडीत बंद**

या अत्याचाराच्या विरोधात आज तामसा शहरातील व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेवत घटनेचा निषेध नोंदवला आहे. आरोपी शिक्षकाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.



**नांदेड-हिंगोली लोकसभा मतदारसंघातील रस्ता कामांना CRF मधून मंजुरी देण्याची मागणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी केली.**

## संक्षिप्त वृत्त

### श्री परमेश्वर यात्रा महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**हिमायतनगर**-हिमायतनगर महाशिवरात्री महोत्सव २४ फेब्रुवारी ते १२ मार्च या कालावधीत होत असून संस्थेतर्फे जय्यत तयारी सुरू केली



आहे. या मोहोत्सवात विविध स्पर्धेचे आयोजन केले असून विजयी स्पर्धकांना तब्बल सात लाख रुपयांच बक्षीस देण्याची तरतूद मंदिर कमिटीने केली आहे.महाशिवरात्र उत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथ ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास २४ फेब्रुवारी पासून सुरुवात होणार आहे. या सोहळ्याची सांगता २३ मार्च रोजी काल्याच्या कीर्तनांना होणार आहे. ज्ञानेश्वरी पाण्याची मुख्य व्यासपीठ शिवाजी जाधव वडगावकर हे सांभाळणार आहे २६ रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी रात्री बारा ते तीन दरम्यान परमेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष तहसीलदार यांच्या हस्ते श्री परमेश्वर अभिषेक सोहळा संपन्न होणार आहे. सप्ताहात रोज सकाळी ५ते६ काकडा भजन, सकाळी ७ ते१० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ते ५ प्रवचन सायंकाळी ६ते७ हारीपाठ, रात्रीं ९ ते ११ हारीकीर्तण होणार आहे. सोमवार दि.२४ रोजी मयुर महाराज कोंडे पुणेकर, मंगळवारी दि.२५ कोंडीबा महाराज पासदगाव, बुधवारी दि.२६ बालयोगी गजेंद्र स्वामी महाराज मधापुरी मठ संस्थान अमरावती, गुरुवारी दि.२७ महेश महाराज महाजन आळंदी, शुक्रवार दि.२८ व्यसनमुक्ती सम्राट रामेश्वर महाराज खोडे दिग्रस, शनिवारी दि.१ गुरुवर्य तानाजी बापू महाराज मुडाना, रविवारी दि.२ नारायण महाराज गरड यांचे कीर्तन, सोमवारी दि.३ दुपारी १ ते ४ काल्याचे किर्तन सोपान महाराज सानप शास्त्री हिंगोली यांचे होणार आहे. दहीहंडी नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे. या भव्य यात्रा महोत्सवाचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष पल्लवी टेमकर उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ सचिव आनंता देवकते यांनी केले आहे.

### माजी विद्यार्थ्यांचे रंगले स्नेहसंमेलन



**निवघा बाजार**-येथील श्री गंगाराम पाटील विद्यालयात सन २००१ - ०२ मधे इयत्ता १० वीत शिकलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांनी तब्बल २३ वर्षांनी एकमेकांच्या भेटी घेत स्नेह संमेलनाचे आयोजन केले . प्रदीर्घ कालानंतर सहकुटूंब भेटून झालेल्या आनंदाला पारावार उरला नव्हता . त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता .शनिवार ( दि.८ ) रोजी निवघा बाजार येथील श्री गंगाराम पाटील विद्यालयाच्या प्रांगणात स्नेहसंमेलनाचा सोहळा पार पडला . निवघा बाजार ते महाराष्ट्रा सह इतर ही भागात विस्तारलेले हे जूने मित्र एकत्र आले . विद्यार्थ्यांनी हा सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करतांना शाळेतील माजी शिक्षकांना विनंतीपुर्वक आमंत्रित करून त्यांचा यथोचित सत्कार केला . या कार्यक्रमाचे आयोजन निवघा बाजार परीसरातील सर्व विद्यार्थ्यांनी पुढाकाराने झाले . कार्यक्रमात उपस्थीत झालेल्या सर्व वर्गमित्र आणि वर्गमैत्रिणिनी एकमेकांना भेटून आस्थेवाईक चौकशी करून हा आनंदोत्सव साजरा केला . शाळेच्या माजी विद्यार्थ्यानी सामुहीक खर्चातून हा कार्यकम घडवून आणला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शिवराज पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव देवराव माटाळकर , माजी मुख्याध्यापक आर. जे. मिजगर , शरद वाकडे , एम. एल. जोगदंड , व्ही. डी. सुर्यवंशी, सुभाष गोवंदे आदी सह शाळेतील शिक्षक व्यासपीठावर उपस्थित होते . शाळेच्या प्रवेशद्वारावर जुनी आठवण म्हणून माजी शिक्षक सुभाष गोवंदे यांनी हातात छडी घेऊन माजी विद्यार्थ्यांच्या हातावर छडी देत शाळेत प्रवेश दिला . हे दृष्य अतिशय विलोभणीय होते. दिवस भर चाललेल्या या कार्यक्रमाला उपस्थित वर्गमित्रांनी शेवटी एक जिव्हाळ्याचा विषय हाती घेऊन आपल्या पैकीच एका वर्गमित्राचा काही दिवसांपूर्वी मृत्यू झाला होता त्यांच्या कुटूंबाला जमेल ती आर्थिक मदत करत त्या मित्राच्या मुलांचा इयत्ता १२ वी पर्यंतच्या शिक्षणाला लागणारा खर्च सर्व वर्गमित्र मिळून उचलणार असल्याचे विचार व्यक्त केल्याने या स्नेहसंमेलनातून दातृत्वभावना ही समोर आली हे विशेष . या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विश्वजीत कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ . संगीता चव्हाण ( कदम ) यांनी मानले .

# नांदेड दक्षिण मधील रस्ते विकासासाठी निधी मंजूर करा : आ. आनंद बोंढारकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १२ फेब्रुवारी**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात रस्ते विकासासाठी भरीव असा निधी द्या अशी मागणी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. आज दिल्लीमध्ये ना. गडकरी यांची आमदार बोंढारकर यांनी भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशभरात राष्ट्रीय महामार्गाचे जाळे विणले जात आहे . राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात विकासाची कामे सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातही राष्ट्रीय महामार्गाने अनेक भागाला




जोडण्यात आलेले आहे. शहरी आणि ग्रामीण भागाचा कायापालट करणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचा लाभ नांदेड जिल्ह्यालाही मोठ्या प्रमाणात मिळाला आहे परंतु नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक भागात रस्ते विकासाची कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. त्यामुळे या भागातील मुसलमानवाडी पिंपळगाव निमजी शेवडी धानोरा माळाकोळी रस्ता , मुसलमानवाडी पिंपळगाव निमजी शेवडी धानोरा माळाकोळी रस्ता , कल्लाळ- काळेश्वर- विष्णुपुरी- पांगरी- असदवन-गोपाळचावडी-तुप्पा-प्रामा-२-काकांडी-किकी राहेगाव-नंदगाव या रस्त्याचे विकासासाठी ५० कोटी रुपयांचा निधी द्यावा अशी मागणीही आ. बोंढारकर यांनी यावेळी केली. यावेळी जिल्हाप्रमुख उमेश मुंडे यांची उपस्थिती होती . नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकासाची चिंता तुम्ही सोडून द्या, तुम्हाला ज्या रस्त्यासाठी निधी लागेल तो निधी उपलब्ध करून दिला जाईल असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी आ. बोंढारकर यांना दिला.

# हमीद पठाण यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १२ फेब्रुवारी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान नांदेड द्वारा आयोजित एक दिवशीय बौद्ध धम्म परिषद सोनारी ता.हिमायतनगर जि. नांदेड येथे शुक्रवारी मोठ्या थाटामाटात संपन्न झाली.याप्रसंगी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यामध्ये भोकर येथील पत्रकार हमीदखान पठाण यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता गौरव राज्यस्तरीय पुरस्कार हादगाव हिमायतनगर तालुक्यातील लोकप्रिय माजी आ.माधवराव पाटील जळगावकर डॉ. रेखाताई चव्हाण अँड. विजय गोणारकर, बालाजी राठोड, धम्म परिषदेचे संयोजक त्रिरत्न कुमार भवरे लक्ष्मणराव भवरे डॉ. मनोज राऊत कानबा पोपुलवार जय भीम पाटील प्रा. घुंगरवार सर अँड. ज्ञानेश्वर पंदलवाड पत्रकार अनिल मादसवार डॉ.कैलास कानिंदे सुप्रसिद्ध गायक अजय देहाडे, रविराज भद्रे प्रा.मोहनराव



मोरे काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष गजानन सूर्यवंशी आनंदराव जळपते अविनाश कदम शिवाजी डोकळे परमेश्वर वालेगावकर भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष प्रताप रोकडे किसनराव ठमके शाहीर बापूराव जमदाडे गौतम राऊत बसवंत कांबळे माजी सभापती जोगेंद्र नरवाडे सेवानिवृत्त मुख्याध्यापक जी.पी. नरवाडे प्राचार्य राजाराम वाघमारे सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी के. डी. देशमुख सामाजिक कार्यकर्ते शेख हाशम, बाबा खान, शेख अशपाक, साहित्यिक भीमराव कावळे गीतकार कवी पाटील गझलकार मधुबावलकर आदीलाबाद वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते वैभव नरवाडे कामारीकर वृत्त वारसदार चे उपसंपादक सुशील भाऊ भवरे डॉ. विजय कांबळे संजय भाऊ निवडांगे शाहीर माधव वाढवे शाहीर शंकर दादा गायकवाड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पत्रकार हमीद पठाण यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हमीद पठाण यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मित्र परिवारांकडून अभिनंदन होत आहे.

# शास्त्री महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १२ फेब्रुवारी**

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात दि.११ फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेच्या इंग्रजी विषयाच्या पहिल्याच पेपरला ७५५ विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली तर तब्बल १७ विद्यार्थ्यांनी दांडी मारली.

सदरील परीक्षा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे यांच्या मार्गदर्शनाखाली तर केंद्र संचालक प्रा.शेख कासिम, उपकेंद्र संचालक प्रा.अरविंद बोधनकर,लिपिक मारोती जगदंबे यांच्या नियंत्रणाखाली सुरू असुन या परीक्षेदरम्यान धर्माबादचे उपविभागीय अधिकारी श्रीमती स्वाती दाभाडे, नायब तहसीलदार जाकापुरे एस.बी. गटशिक्षणाधिकारी मरकंटे आर.एम. इत्यादींनी परीक्षा केंद्रावर भेट दिली असून, बैठी पथकातील सौ.पाठक एम.जे. सौ.कंदकुर्तीकर एम.जी. श्रीमती हालगे ए.एम. कुलकर्णी टी. व्ही. यांची परीक्षा केंद्रावर उपस्थिती होती. पहिल्या दिवशी परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त पार पडली असून परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त पार पाडण्यासाठी धर्माबाद पोस्टचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांनी चोखपणे पोलीस बंदोबस्त बजाविला तर परीक्षा सुरळीतपणे होण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# व्यसनाधीनतेकडे नव्हे तर राष्ट्र निर्माणाकडे वळा

## महात्मा गांधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना राम तरटे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १२ फेब्रुवारी**

शाळा महाविद्यालयीन जीवनापासूनच अनेक विद्यार्थ्यांना तंबाखू , सिगारेट , गुटखा , दारू अशी व्यसन जडत असतात. त्यामुळे भविष्यात त्यांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनावर मोठे दुष्परिणाम होत असतो हे दुष्परिणाम टाळण्यासाठी तरुणांनी व्यसनाधीनतेकडे नव्हे तर राष्ट्र निर्माणाकडे वळावे असे आवाहन पत्रकार राम तरटे यांनी केले आहे.

महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपुर येथे आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनात ते उद्घाटक म्हणून बोलत होते . यावेळी महात्मा गांधी महाविद्यालयाचे संस्थाचालक एडवोकेट बेंडकुळे



, प्राचार्य शेळके , प्रा. नरवाडे , प्रा.जाधव , प्रा. कांबळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक , प्राध्यापिकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अलीकडच्या काळात शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात व्यसन लागल्याचे दिसून येते . या व्यसनाधीनतेतून अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य आणि करियर बरबाद झालेले आहेत. व्यसनाधीन झाल्यानंतर अनेक तरुणांच्या हातून समाजविघातक कारवायानाही बळ दिले जाते. त्यामुळे सामाजिक दंगली घडतात . या दंगलीतील हात होण्यापेक्षा दंगल विजून राष्ट्राच्या निर्माण साठी परिश्रम घेणारे हात व्हा . ज्यामुळे स्वतःचा , स्वतःच्या कुटुंबाचा , समाजाचा , राज्याचा आणि देशाचा ही सर्वांगीण विकास होईल असेही राम तरटे यावेळी म्हणाले . शाळा आणि महाविद्यालय परिसरामध्ये सरकारने तंबाखू बंदी केलेली आहे . तरीही विद्यार्थी अशा व्यसनाच्या आहारी जात असल्याची चिंता आई-वडिलांनाही भेडसावत असल्याचे ते म्हणाले. जोपर्यंत आपण आपल्या आई-वडिलांचे कष्ट थांबवण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून अभ्यासासाठी परिश्रम घेणार नाहीत तोपर्यंत आपल्या घरातील दारिद्र्य जाणार नाही . आर्थिक आणि बौद्धिक दारिद्र्य संपुष्टात आणण्यासाठी निरोगी आयुष्य अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचेही ते यावेळी म्हणाले. आपल्या खुमदार शैलीतून विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर विद्यार्थ्यांना हसवणाऱ्या कथाकथनाचाही त्यांनी आस्वाद दिला.

# शेतकऱ्यांच्या पुलाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावू- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. १२ फेब्रुवारी**

तालुक्यातील मन्याड नदीच्या कडेवर वसलेले वझरगा, तुपशेळगाव, आणि गळेगाव या तिन गावचे शिवार आहे. यामध्ये शेकडो एकर जमीन प्रभावीत होत असते. मात्र लगतच्या वसलेल्या तिन्ही गावातील शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी मन्याड नदीला ओलांडून जावे लागते. ज्यामध्ये शेतकऱ्यांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो आहे. अशावेळी पान्याचा प्रवाह अचानकपणे वाढल्यास शेतकऱ्यांचा जीव गेल्याशिवाय राहणार नाही. या गंभीर मुद्द्याला अनुसरूनच



गेल्या अनेक वर्षापासून वझरगा येथील शेतकरी प्रशासन तथा लोकप्रतिनिधींना सतत पाठपुरावा चालू ठेवला होता . याच अनुषंगाने संबंधित विषयाची गांभीर्याने दखल घेत नवनियुक्त जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे आपला पहिला दौरा थेट वझरगा येथील मन्याड नदीवर भेट देऊन सुरुवात केला आहे. ग्रामीण भागातील पहिला दौरा थेट शेतकऱ्यांसाठी झाल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. शिवाय जीवघेणं अवस्थेतून आपली सुटका होणार या आशेने शेतकऱ्यांनीही श्वास मोकळा केला.

# नायगांव तालुक्यात बारावीच्या परीक्षा कॉपी मुक्त वातावरणात

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. १२ फेब्रुवारी**

मंगळवार दि. ११ पासून इयत्ता १२ वी च्या परीक्षेला सुरुवात झाली असून नायगाव तालुक्यात ९ परीक्षा केंद्रा वर४९०३विद्यार्थी पैकी ४८३५परीक्षा दिली असून,६८ विद्यार्थी आनुउपस्थित राहिल्याने ते परिक्षे पासून वंचित राहिले आहेत. ही माहिती नायगांव परिक्षक अधिकारी रेंनगुंटवार सर यांनी दिली. तालुका प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेऊन कॉपी मुक्त व तणाव मुक्त वातावरणात परीक्षा व्हाव्यात यासाठी शिक्षण विभाग व कडक पोली स बंदोबस्तासह अनेक उपाय योजणा राबवण्यात आली आल्याची माहिती नायगाव प.स.चे गट शिक्षणाधिकारी संग्राम कांबळे यांनी दिली.

या वर उपाय योजना संदर्भात तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली परिक्षेपुर्वीच दक्षता समितीची नुकतीच बैठक घेण्यात आली होती. व त्यात तालुका स्तरावर बैठे पथके तर तालुका व जिल्हास्तरावरुन वेगवेगळी पथके तयार करून यावेळी विविध उपाय योजना करण्यात आली आहे.अशी माहिती ही कांबळे यांनी दिली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचा पहिल्याच भेटीत गैरव्यवस्थेवर प्रहार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १२ फेब्रुवारी**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी रुजू झाल्यानंतर पहिली कारवाई बारावीच्या परिक्षेदरम्यान हलगर्जीपणा दाखविणाऱ्या केंद्र प्रमुखावर,पर्यवेक्षकावर केली आहे. सोबतच परिक्षा केंद्रात अनधिकृतपणे उपस्थित असणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. तर कॉपी पुरवणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहे.

नांदेड जिल्ह्यात कोणत्याही केंद्रावर, कुठेही कॉपी करणाऱ्यांची हयगय करू नये, पोलिसांनी सक्त



कारवाई करावी. शिक्षण विभागाने आवश्यक सुविधा पूर्ण कराव्यात अशा सूचना त्यांनी केल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज कंधार तालुक्यातील विविध परिक्षा केंद्राना भेटी दिल्या. यादरम्यान, परिक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा त्यांना आढळून आल्या नाहीत. या भेटीदरम्यान त्यांच्यासोबत शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर उपस्थित होते. त्यांनी याबद्दल गंभीर आक्षेप घेतले असून शिक्षणाधिकाऱ्यांना भेटी दरम्यान तात्काळ कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. नोटीस बजावलेल्या केंद्र संचालकामध्ये भीमशंकर उच्च माध्यमिक विद्यालय, शिराढोण, ता. कंधार, श्री. गोविंदराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, चिखली ता. कंधार, नेताजी सुभाषचंद्र उच्च माध्यमिक विद्यालय, पानभोसी ता. कंधार यांचा समावेश आहे.

याशिवाय परिक्षा केंद्रामध्ये कोणतीही जबाबदारी सोपवली नसताना उपस्थित असणाऱ्या तीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. यामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस, ज्युनियर कॉलेज पानभोसी येथील सहशिक्षक श्रीमती दहीहंडे गवळी, श्रीमती एम.ए. खान, लिपिक ए.यु.शेख यांचा समावेश आहे. याशिवाय परीक्षेदरम्यान नकला करण्यास मदत करणाऱ्या बाहेरील व्यक्ती श्रीनिवास अर्जून भुसेवाड, प्रणव अनिल टोम्पे, गणपत जळबा गायकवाड, दस्तगीर खमरोद्दीन, शिवाजी नारायण कदम रा. चिखली यांच्यावर भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. उस्मान नगर पोलीस ठाण्यात ही कारवाई करण्यात आली असून पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर यांनी यासंदर्भात गुन्हे नोंदविले आहेत.

# मुदखेड येथील श्रीगणेश मंदीर कलशारोहण सोहळा

## ह भ प सुनिल महाजन आष्टीकर यांचे किर्तन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १२ फेब्रुवारी**

मुदखेड शहरातील सुभाष गंज मोंढा भागात असलेल्या श्री गणेश मंदिर कलशारोहण सोहळा व श्री गणेश महापुराण कथा ज्ञान यज्ञ कार्यक्रमाचे भव्य आयोजन दिनांक २१ फेब्रुवारी रोजी आयोजित केलं आहे.

ह. भ. प. सुनिल महाजन आष्टीकर यांच्या अमृतवाणीतून श्री गणेश महापुराण कथा ज्ञान यज्ञ

कार्यक्रम आरंभ मिती माघ कृ.०२ शके १९४६ दि.१४



फेब्रुवारी रोज शुक्रवार पासून दुपारी वेळ १ ते ४ ला सुरूवात करण्यात येणार असुन कथेची सांगता दि. २० फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे . दि.२१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:०० ते ११:०० ह भ प सुनिल महाजन आष्टीकर यांचे काल्याचे कीर्तन सुभाष गंज मोंढा मैदानावर होणार आहे. श्री गणेश महापुराण कथा ज्ञान यज्ञ व कलशारोहण कार्यक्रमास संपन्न होताच महाप्रसादाचा लाभ शहरातील बायलेकी तसेच भक्तगण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान श्री गणपती मंदिर संस्थान व समस्त गावकरी मंडळी मुदखेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### दर्पण पुरस्कार वितरण सोहळा तुर्तास रद्द

**परभणी,/प्रतिनिधी :** कै. सौ. कमलताई जामकर दर्पण पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा आज मंगळवारी (दि.११) जिंतूर रस्त्यावरील महिला महाविद्यालयाच्याा सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला होता. परंतु, या पुरस्काराच्या मानकरी श्रीमती योजना घरत यांच्या मातोश्रींचे दु:खद निधन झाल्यामुळे हा सोहळा पुढे ढकलण्यात आला आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

### ट्रकने उडवल्याने मोटारसायकलस्वाराचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा ते नांदेड या रस्त्यावर चुडावा गावाजवळ एका ट्रकने दिलेल्या जोरदार धडकेने दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाला. रविवारी ही दुर्देवी घटना घडली.

तालुक्यातील माखणी येथील राम नेमाजी गाडे व शिवाजी शंकर गाडे हे दोघे नांदेड येथील लग्नसोहळा आटोपून एम.एच. २२ ए.क्यू. ७७०८ या दुचाकीवरुन गावाकडे जात होते. चुडाव्याजवळ समोरून येणाऱ्या आयशर या ट्रकने (एमएच १२ टीव्ही १८३५) जोरदार धडक दिली. त्यात शिवाजी गाडे यांच्या डोक्यास जबर मार लागला. तर राम गाडे हे ही जखमी झाले. दरम्यान, नांदेड येथील एका रुग्णालयात उपचार सुरु असतांना शिवाजी गाडे यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर सोमवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने गावात मोठी शोककळा पसरली.

### संजय वैद्य नांदखेडकर यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील स्टेडिअम कॉम्प्लेक्समधील सरस्वती टाईपरायटरचे संचालक संजय भगवानराव वैद्य नांदखेडकर यांचे सोमवारी (दि.१०) सायंकाळी ५.२० वाजता निधन झाले. मृत्यू समयी ते ५६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, इंजि. निखिल, डॉ. श्रेयस ही दोन मुले, सून, तीन भाऊ, एक बहिण असा मोठा परिवार आहे.

दरम्यान, संजय वैद्य नांदखेडकर यांच्या पार्थीवावर मंगळवारी सकाळी ९ वाजता जिंतूर रस्त्यावरील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. तत्पूर्वी अमेय नगर येथील त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार आहे.

### शेख राजूर शिवारात वृध्दाचा आढळला मृतदेह

**परभणी,/प्रतिनिधी :** पालम तालुक्यातील शेख राजूर शिवारात एका अनोळखी वयोवृध्द नागरीकाचा सोमवारी (दि.१०) मृतदेह आढळून आला.

प्रत्यक्षदर्शनींनी तात्काळ पालम पोलिसांना त्याबाबत माहिती कळविली. पोलिसांनी धाव घेवून पंचनामा केला. त्या वयोवृध्दाची ओळख पटेल असे कोणतेही साहित्य मिळून आले नाही. पोलिसांनी या संदर्भात मृतदेहाची ओळख पटविण्या संदर्भात प्रयत्न सुरु केले होते.

### गंगाखेड तालुक्यातील झोला पाटीजवळ कार अपघातात एकाचा मृत्यू

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** तालुक्यातील झोला पाटीजवळ कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला तर एकजण जखमी झाला. ही दुर्देवी घटना सोमवारी (दि.१०) रात्री ९.३० वाजेच्या सुमारास घडली.

कृष्णा अच्युतराव भिसे (वय ४० वर्षे), पप्पु अच्युतराव डुबे (वय २८ वर्षे) हे दोघे एम.एच. ४३ ए.आर.९३०७ या क्रमांकाच्या कारने गंगाखेड येथून प्रिंप्रीकडे जात होते. त्यावेळी तालुक्यातील झोला पाटीजवळ रस्त्याच्या बाजूला असलेल्या खडीच्या ढिगाऱ्यावर कार गेल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला, त्यामुळे कार रस्त्याच्या बाजूला खड्ड्यात जाऊन पलटी झाली. या अपघातात कारमधील दोघेही जखमी झाले. जखमींना उपचारसाठी गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कृष्णा भिसे यांना मयत घोषित केले तर पप्पु डुबे यांना पुढील उपचारसाठी परभणी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, या प्रकरणी दशरथ भिसे यांच्या फिर्यादीवरुन गंगाखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जिल्हयातून थंडी झाली गायबच

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयातून गेल्या काही दिवसापासून थंडी अचानक गायब झाली आहे. त्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांना चांगलाच होत आहे. त्यातच या थंडीमुळे नागरिकांना काहीसा दिलासा तर मिळतच होता परंतू लवकरच उन्हाची वाढ झाली असल्यामुळे यंदाचा उन्हाळा देखील कसा असेल असा अंदाज सर्वसामान्य नागरिक आतापासून करु लागले आहेत.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# दर्जेदार रस्ते पायाभुत विकासाला चालना देतात- आ.डॉ.गुट्टे

**मोहन धारासूरकर**

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-:** गाव आणि शहरांना जोडणारे रस्ते लोकोपयोगी असतात. त्यामुळे स्थानिकांचे व परिसरातील नागरिकांचे दळणवळण सुखकर होते. रस्ते निर्मातीचे अनेक फायदे असतात. चांगल्या पायाभुत सुविधांचा महत्त्वाचा घटक म्हणूनही रस्त्यांकडे पाहिले जाते. रोजगार, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य या सारख्या मुलभूत गरजांना परस्परांशी जोडणारा दुवा म्हणजे रस्ता असतो. त्यामुळे दर्जेदार रस्ते पायाभुत विकासाला चालना देतात, असे मत स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी व्यक्त केले. तालुक्यातील चोरवड येथे आयोजित रस्ता भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी राज्यमार्ग २४९ हिंगोली-औंढा-हट्टा- पूर्णा-पालम-चोरवड-राणीसावरगाव या जवळपास २२० कोटी रूपये निधीच्या तब्बल ४१ किमी रस्त्याचे भूमिपूजन आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते पार पडले. मतदारसंघातील गावोगावी पायाभूत सुविधा निर्माण करून देण्यासाठी कटिबध्द असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. याप्रसंगी नियोजित रस्त्यामुळे दळणवळण तर सुखकर होईल, मात्र इतरही समस्या सुटतील, असे उपस्थित नागरिकांनी म्हटले. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, राज्यमार्ग २४९ हिंगोली-औंढा-हट्टा- पूर्णा-पालम-चोरवड-राणीसावरगाव या रस्त्याचा प्रश्न वर्ष प्रलंबित होता. गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना रस्त्याअभावी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे स्थानिकांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून आपण पाठपुरावा केला होता. त्यास



यश आले असून आज त्याचे भूमिपूजन करताना समाधान वाटले. आता नागरिकांची समस्या कायमची दूर होणार आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अंतर्गत हे काम पूर्णत्वास जात आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यास परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होईल. तसेच या भागातील दळणवळण सुखकर झाल्याशिवाय राहाणार नाही, असा मला विश्वास आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम पाटील तर सूत्रसंचालन पदुदेव जोशी यांनी केले. आभार विजय घोरपडे यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष गणेशराव दादा रोकडे, माजी जिल्हा परिषद सदस्य रत्नाकरजी शिंदे, पालम तालुका प्रभारी माधवराव गायकवाड, ताडकळस कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बालाजी रुद्रवार, तालुकाध्यक्ष चंद्रशेखर लांडगे, युवक जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब ढोले, राष्ट्रवादी युवक विधानसभा अध्यक्ष कृष्णा दळनर, युवक तालुकाध्यक्ष विजय घोरपडे, रासपा तालुकाध्यक्ष तुकाराम पाटील, नगराध्यक्ष उबेद खान पठाण, अजीम खान पठाण ,अल्ताफ शेख, बालाजी लटपटे, ओबीसी तालुकाध्यक्ष पवन सोन्नर, विजय गाणार, गजानन सुरनर, मोतीराम खंडाळे, उप अभियंता बालाजी पवार यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सेलू नगर परिषदेच्या गलथान कारभाराचा कळसच

**शिवाजी आकात**

### नागरिकांना भुर्दंड, जबाबदार अधिकाऱ्याकडून खर्च वसूल करण्याची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरात विकासकामांचा धडाका मागील काही दिवसांपासून सुरू आहे.नवीन रस्ते,नाली,सुशोभीकरण आदी नागरिकांच्या सुविधेसाठी करण्यात येत आहे.याचाच भाग म्हणून छत्रपती शिवाजी महाराज ते मदरसा पर्यंत असलेला रस्ता हा नगर परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला वर्ग करून नवीन राज्य महामार्ग गेल्यावर्षी तयार करण्यात आला होता.या राज्य महामार्गावर दळण वळण मोठ्या प्रमाणत वाढलेले असून नागरी वस्ती मुळे दरदिवशी अनेक अपघात होत आहेत.त्यातच भरीस भर म्हणून वालूर नाका परिसरात जलवाहिनी जोडणीचे काम मागील दीड महिन्यापासून हाती घेण्यात आले असून नवीन झालेल्या रोडवर मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले आहे अद्यापही हे काम पूर्ण झालेले नसून नवीनच झालेल्या राज्य महामार्गाचे मोठे नुकसान करण्यात आले आहे.हा राज्य महामार्ग बनविण्याचे काम सुरू असताना अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अंतर्गत असलेल्या जलवाहिनीचे काम त्याच वेळी हाती घेवून पूर्ण केले गेले नाही त्यामुळे सद्यस्थितीत नवीन झालेला रोड खोदून जोडणी करण्यात येत आहे.या मनमानी कारभारामुळे नागरिकांकडून गोळा केलेला पैशाचा अपव्यय होत असून गैर जबाबदारीने वागणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांच्या पगारातून हा खर्च वसूल करण्यात यावा अशी मागणी मोरया प्रतिष्ठान व सेलू शहरातील नागरिकांकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## राज्यस्थानीच्या अध्यक्षासह पदाधिकाऱ्यांविरुध्द सेलूत गुन्हा

### साडेचार लाख रूपयांचा अपहार करून फसणूक केल्याप्रकरणी गुन्हा

**सेलू,/प्रतिनिधी:** परळी वैजनाथ येथील राजस्थानी मल्टिस्टेट को.ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेडच्या सेलू शाखेत फिर्यादीची फसवणूक करून त्याच्या ४ लाख ५० हजार रूपये रकमेचा संगनमत करून अपहार केला आहे. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष चंदुलाल मोहनलालजी बियाणी, पदाधिकारी व शाखाधिकारी अशा सहा आरोपीसह सोसायटीविरूद्ध विविध कलमांखाली सेलू पोलिस ठाण्यात सोमवारी. १० फेब्रुवारीरोजी अपहार व फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




या प्रकरणी अभय लक्ष्मीकांत सुभेदार (वय ५० वर्षे, रा.सुभेदार गल्ली, सेलू जि.परभणी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी अभय सुभेदार यांनी परळी वैजनाथ येथील राजस्थानी मल्टीस्टेट को.ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेडच्या सेलू शाखेत बचत खाते के ६४/५ मध्ये १ सप्टेंबर २०२३ रोजी ४ लाख ५० हजार रूपये अनामत ३० दिवसांकरिता मुदत ठेव म्हणून ठेवली होती. मुदत संपल्यानंतर बँकेत रक्कम काढण्यासाठी ते गेले. रितसर विड्राल फार्म भरुन दिला असता आरोपितांनी अरेरावीची भाषा वापरुन शिवीगाळ करुन धमकी दिली. ''आम्ही तुमचे पैसे देवु शकत नाही. तुम्हाला काय करायचे ते करा.'' असे सांगून नियोजनबध्द कट रचून फसवणूक करुन त्यांच्या रकमेचा अपहार केला. यावरून न्यायालयाच्या आदेशानुसार सोमवारी रात्री साडे आठ वाजता राजस्थानी मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी तसेच अध्यक्ष चंदुलाल मोहनलालजी बियाणी (रा.लातूर), उपाध्यक्ष बालचंद लोढा, सचिव बद्रीनारायण बाहेती, सहसचिव पी.डी.अग्रवाल, कोषाध्यक्ष विजय प्रकाश लड्डा (सर्व रा.परळी वैजनाथ जि.बीड), शाखाधिकारी नंदकिशोर सोमाणी (रा.स्टेशन रोड, सेलू जि. परभणी) यांच्याविरूद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### परभणी शहरात रस्त्याचे काम सुरु

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या सुरु असून या कामाचा नागरिकांत आनंद आहे.

## प्रिन्स इंग्लिश स्कूलच्या गौरी अबुजची डॉ.होमी भाभा ज्युनिअर सायंटिस्ट परीक्षेच्या मुलाखत व प्रकल्पसाठी निवड



**सेलू,/प्रतिनिधी:** श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल ही शैक्षणिक गुणवत्ता आणि स्पर्धा परीक्षांमधील यशासाठी प्रसिद्ध आहे. याच यशाची परंपरा पुढे नेत गौरी श्रीहरी अबुज (वर्ग ६वी) हिने डॉक्टर होमी भाभा ज्युनिअर सायंटिस्ट परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

तिने प्रथम आणि द्वितीय फेरीत उज्ज्वल यश मिळवून अंतिम मुलाखत व प्रकल्प फेरीसाठी निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्रिन्सिपल कार्तिक रत्नाला, प्रगती क्षीरसागर, स्पर्धा परीक्षा प्रमुख अर्जुन गरुड व संपूर्ण शाळा परिवाराने गौरीचे मनःपूर्वक अभिनंदन केले. व पुढील वाटचालीसाठी प्रिन्स इंग्लिश स्कूलच्यावतिने शूभेच्छा देण्यात आल्या.

## मांडवा येथे विवाहितेने केली आत्महत्या

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील मांडवा येथील एका झाडाला साडी ने गळफास लावून आत्महत्या केल्याचे घटना दि.११ फेब्रुवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली असून विवाहित महिलेचे नाव मनकर्णा लहू जाधव वय ३० वर्ष रा.साई नगर तांडा येथील असल्याचे समजते.



औंढा तालुक्यातील अंजनवाडा तांडा येथील विवाहित महिला मनकर्णा लहू जाधव यांचा विवाह १० ते १२ वर्षा पूर्वी जिंतूर तालुक्यातील इटोली परिसरातील साई नगर तांडा येथील युवक लहु जाधव यांच्या सोबत झाले होते.विवाहीत महिलेला मुल बाळ नव्हते दरम्यान दि.११ फेब्रुवारी सकाळच्या सुमारास मांडवा परिसरातील एका झाडाला साडी गळ्यात लावून गळफास लावून लटकलेल्या अवस्थेत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिस निरीक्षक बुध्दीराज सुकाळे,पिएस आय मैत्रे,बिट जमादार दत्तात्रेय गुगाणे,पो. शि.सावंत यांच्या पथकाने घटनास्थळावरून नागरिकांच्या मदतीने शव काढून दुपारच्या सुमारास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉ.अक्षय भंगीरे,रुग्ण कक्ष सेवक गंगाधर पालवे यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांना देण्यात आले असून याप्रकरणी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास बिट जमादार दत्तात्रेय गुगाणे करत आहे.

# आंबेडकरी जनतेला न्याय द्या, अन्यथा मंत्रालयाला घेराव घालू

### सिध्दार्थ हत्तीअंबीरे यांचा इशारा : मुंबईत पत्रकार परिषद

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणीमध्ये संविधानाची विटंबना केल्यानंतर संतप्त जनता रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असताना पोलिसांनी लाठीचार्ज केला. यामध्ये जखमी झालेल्यांना राज्य सरकारने तातडीने नुकसान भरपाई देवून आंबेडकरी जनतेला न्याय द्यावा अन्यथा ३ मार्च रोजी महाराष्ट्रातील सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, संविधानप्रेमी जनतेच्या वतीने आंदोलन करत मंत्रालयाला घेराव घालण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभागाचे अध्यक्ष सिध्दार्थ हत्तीअंबिरे यांनी दिला आहे.

बुधवार १२ फेब्रुवारी रोजी मुंबईत पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी माध्यमांच्या प्रतिनिधींशी हत्तीअंबीरे यांनी संवाद साधला. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते आणि स्लम सेल विभाग मुंबई अध्यक्ष सुरेशचंद्र राजहंस, अनुसूचित जाती विभाग मुंबई अध्यक्ष कचरु यादव, महासाचिब महेंद्र मुणगेकर, रमेश कांबळे, राज वाल्मिकी, व इतर उपस्थित होते.

पुढे बोलतांना हत्तीअंबीरे म्हणाले, परभणीमध्ये संविधानाची विटंबना केल्यानंतर संतप्त जनता रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असताना पोलिसांनी लाठीचार्ज केला. कोंबिंग ऑपरेशन करून शेकडो आंबेडकरी जनतेला बेदम मारहाण केली, अनेक निष्पाप नागरिकांना अटक केली. आंबेडकरी विचाराचा तरुण सोमनाथ सुर्यवंशी यालाही अटक करुन कोठडीत मारहाण केली, यातच त्याचा मृत्यू झाला, पण सरकारने या प्रकरणी पोलिसांवर कठोर कारवाई केली नाही. सुर्यवंशी मृत्यूची चौकशी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तीमार्फत करावी, तसेच संबंधित पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे, अशा मागण्या हत्तीअंबिरे यांनी केल्या आहेत.

पोलिसांच्या कारवाईमुळेच सुर्यवंशी व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते विजय वाकोडे यांचा मृत्यू झाला. या घटनेला दोन महिने झाले तरी या दोन्ही कुटुंबांना अजून न्याय मिळालेला नाही, सरकार चौकशीच्या नावाखाली पोलिसांना वाचवत आहे, असा आरोप करी हत्तीअंबीरे यांनी सरकारने या पोलिसांवर कठोर कारवाई करावी, कोंबिंग ऑपरेशन दरम्यान ज्या आंबेडकरी लोकांवर गुन्हे दाखल केले ते तात्काळ रद्द करावे, सोमनाथ सुर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, सुर्यवंशी व वाकोडे यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला सरकार नोकरीत सामावून घ्यावे, संबंधित पोलीसांवर हत्येच्या गुन्ह्यासह ऍट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करावे, पोलिस मारहाणीत जखमी झालेल्यांना नुकसान भरपाई द्यावी आदी मागण्या केल्या आहेत.

### वितरण कंपनीचा वरिष्ठ तंत्रज्ञ चतुर्भूज

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्य विद्युत वितरण कंपनीच्या पाथरी उपविभागांतर्गत ग्रामीण शाखेतील वरिष्ठ तंत्रज्ञ ज्ञानोबा नारायणराव पितळे यास नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याकरीता एका शेतकऱ्यांकडून ३ हजार रुपयांची लाच स्विकारतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या एका पथकाने ताब्यात घेतले. मंगळवारी (दि.११) दुपारी पथकाने ही कारवाई केली.

झरी कॅनॉलजवळील असलेल्या शेतातील विद्युत मोटारीकरीता डिपीवर नवीन ट्रान्सफार्मर बसवून देण्याकरीता एका शेतकऱ्याने वरिष्ठ तंत्रज्ञ ज्ञानोबा पितळे यांच्याशी संपर्क साधला, तेव्हा पितळे याने ३ हजार रुपये द्यावे लागतील, असे सूनावले. त्यामुळे संतप्त शेतकऱ्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या परभणी कार्यालयाकडे लेखी तक्रार दाखल केली, त्याआधारे या खात्याच्या पथकाने पंचासमक्ष त्या संदर्भात खात्री केली अन् मंगळवारी सिमुरगव्हाण फाटा येथील मोहिनी टी हाऊसवर सापळा रचून पितळे यास ३ हजार रुपयांची लाच स्विकारतेवेळी ताब्यात घेतले. या पथकाने पितळे याची अंग झडती घेतली तेव्हा रोख आठ हजार रुपये आढळून आले. तर घराची झडती घेतली असता या झडतीतून ६ लाख ९५ हजार ११० रुपये पथकाने जप्त केले.

# हिंगोलीच्या शेतकऱ्यांना मुंबई पोलिसांनी घेतले ताब्यात

## विविध मागण्यांसाठी मंत्रालयापुढे करणार होते अर्ध नग्न आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**
शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याच्या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी हिंगोली येथील शेतकरी मंत्रालयासमोर अर्धनग्न आंदोलन करण्यासाठी मुंबईच्या दिशेने निघाले असता त्यांना बुधवार दि १२ रोजी वाशी चेकपोस्टवर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. परंतु शेतकरी मंत्रालयासमोरच आंदोलन करण्यावर ठाम आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफ करून सातबारा कोरा करावा, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ पीकविमा द्यावा, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावीत, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा यासह इतर मागण्यांसाठी शेतकरी नामदेव पतंगे, गजानन कावरखे, दिपक सावके, प्रवीण मते, राजेश मते, गजानन जाधव, शांतीराम सावके यांच्यासह शेतकऱ्यांनी दि ११ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन केले. त्यानंतर सदर शेतकरी मंत्रालय येथे आंदोलनासाठी रवाना झाले.

दरम्यान, आज दुपारच्या सुमारास शेतकऱ्यांचे वाहन वाशी येथील चेकपोस्ट येथे पोहचल्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. यावेळी पोलिस व शेतकरी यांच्या काहीवेळ शाब्दीक चकमक झाली. आम्हाला अडवले तर रस्त्यावर आंदोलन सुरू करू असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. मात्र शेतकऱ्यांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून पोलिसांनी सर्वांनाच ताब्यात घेतले. यावेळी शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोलिसांनी कितीही अडवण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही मंत्रालयासमोर अर्धनग्न आंदोलन करणारच अशी प्रतिक्रीया शेतकरी गजानन कावरखे, नामदेव पतंगे यांनी दिली आहे.

# कहाकर बु. येथील बैलगाडी रस्ता खुला करण्यासाठी वृध्दाचे आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**
जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील कहाकर बु. येथील गट क्रमांक ७७१ मधील शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी पूर्वीचा असलेल्या बैलगाडी रस्ता खुला करून शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी यासाठी मागील तीन दिवसांपासून एक सत्तर वर्षिय वयोवृद्ध शेतकरी आपल्या कुटूंबासहीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण करत आहेत. मात्र प्रशासनाने त्यांची अद्याप कुठलीही दखल घेतली नाही. शेतरस्ता गाडी रस्ता अडवल्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व प्रशासनाला दिले होते. मात्र हिंगोली जिल्हा प्रशासनाकडून केराची टोपली दाखवल्याचे दिसुन येत आहे.

कहाकर बुद्रुक येथील शेतकरी दत्ता जयराम गिरी, सिंधू दत्ता गिरी, डिगांबर जय रामगिरी, कावेरी दिगंबर गिरी, यांनी लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले होते. त्यात ७७१ शिवारातील गट क्रमांक मध्ये आमच्या मालकीची शेती आहे. शेती निगडित कामे करण्यासाठी सर्व शेतकरी पूर्वीचा असलेल्या बैलगाडी रस्त्याचा वापर करतात मात्र अधिकृत बैलगाडी रस्ता हा काही जातीवादी शेतकऱ्यांनी जाणीवपूर्व अडवुन त्या बैलगाडी रस्त्यावर पिकाची पेरणी केली आहे परिणामी तो बैलगाडी रस्ता बंद केला आहे. तालुका प्रशासनाने योग्य कारवाई करून बैलगाडी रस्ता खुला करून द्यावा. यासाठी शेतकऱ्यांनी वेळोवेळी मागणी केली परंतु तहसीलदार सेनगाव यांनी आमच्या विनंती अर्जाची केवळ दृष्टीने दखल घेतली. मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळी येऊन वास्तववादी पंचनामा करून शेतामध्ये शेतकऱ्यांना जाण्यासाठी पूर्वीचाच रस्ता असल्याचा अहवाल सादर केलेला आहे. याचीही दखल घेतली नाही. याउलट तहसीलदारांनी गैर अर्जदारास बोलावून शेतकऱ्यांच्या विरोधात एकतर्फी व अन्यायकारक निर्णय देऊन तालुका प्रशासनाने शेतकऱ्यावर अन्याय केला आहे. आम्ही काही शेतकऱ्यांनी सदरील गट नंबरमध्ये नव्याने शेती खरेदी विक्रीचा व्यवहार केला आहे. ज्या व्यक्तीकडून शेतकरी खरेदी केली त्या खरेदी खतावर शेतमालकाने बैलगाडी रस्ता असल्याचे लिहून दिले आहे मूळ कागदपत्रे व मंडळ अधिकारी यांचा वास्तववादी पंचनामा प्रशासनाने विचारत नाही घेता एक तर्फी निर्णय का घेतला हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. उपविभागीय अधिकारी हिंगोली यांच्याकडे अपील दाखल केले होते परंतु कुठलीही शहानिशा न करता तोच निर्णय कायम ठेवला आहे. परिणामी आम्हा शेतकऱ्यांना रस्त्या अभावी शेतात येजा करणे मुश्किल बनल्याने गैरसोय होत आहे. आम्ही अल्पसंख्यांक असून सधन व जातीय संख्या बळ असलेल्याकडून नाहक बैलगाडी रस्ता अडवून त्रास देण्याचा प्रकार घडत आहे. तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या चुकीच्या व अन्यायकारक निर्णयाची चौकशी करून दोघांविरुद्ध कारवाई करावी. पूर्वीचाच अधिकृत असलेल्या बैलगाडी रस्ता खुला करून द्यावा, अशी मागणी केली आहे १० फेब्रुवारी पासून सदर शेतकऱ्यांनी आमरण उपोषण सुरू केले असून तब्बल तीन दिवस उलटून ही जिल्हा प्रशासनाने याची दखल घेतली नाही.

# डॉ. पी. पी. वावा यांनी घेतला विविध योजनांचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**
राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा हे दि. १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी हिंगोली दौऱ्यावर आले असता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात विविध विभागातील सफाई कामगारांच्या योजनांचा आढावा घेतला.




यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधिकारी, समाज कल्याण अधिकारी राजु ऐडके, शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के, दिग्रसकर, आरोग्य अधिकारी कामगार अधिकारी, विकास अधिकारी, हिंगोलीचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्यासह नगर परिषदांचे मुख्याधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आयुक्त आणि जिल्ह्यात सर्व नगर परिषदांचे मुख्याधिकारी यांच्यासोबत सफाई कर्मचारी यांच्या अडचणीवर चर्चा करण्यात आली. सफाईगार कर्मचाऱ्यांच्या विविध योजनाशी संबंधित अग्रणी बँकेचे अधिकारी, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आणि जिल्ह्यातील संबंधित आढावा घेण्यात आला.

यावेळी उत्कृष्ट काम करणाऱ्या सफाई कामगारांना सत्कार करीत त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी विविध योजनेअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना घरकुलाची चावी, आयुष्मान योजनेंतर्गत ५ लाखांपर्यत मोफत उपचाराचे कार्ड आदींची वाटप करण्यात आले. यावेळी सफाई कामगारांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




**हिंगोली– राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ पी पी वावा यांच्या उपस्थितीमध्ये विविध विभागातील सफाई कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. यावेळी वावा यांचेहस्ते सफाई कर्मचाऱ्यांना कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्याधिकारी अरविंद मुंढे आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**


## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदी अन्नपूर्णा चौधरी



वसमत– येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या युवक मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या हस्ते सौ अन्नपूर्णा प्रकाश चौधरी यांची हिंगोली राष्ट्रवादी महिला शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्या नियुक्तीचे पत्र त्यांना यावेळी देण्यात आले याप्रसंगी आमदार राजू नवघरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र दिव्यांग आघाडीचे कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर, जिल्हाध्यक्ष बी.डी.बांगर, महिला जिल्हा अध्यक्षा सौ. कांचनताई शिंदे पाटील, शहराध्यक्ष केशव दुबे, विश्वनाथ घुगे, माजी नगरसेवक हकीम बागवान, सांस्कृतिक वं क्रीडा जिल्हा अध्यक्ष सागर चौधरी, सुजय देशमुख, गुड्डू इंगळे, शेख हनीफ, सूरज वडकुते, तेजस पवार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### कृषी विभागातील स्पर्धकांना बक्षीस वितरण



हिंगोली– जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी कार्यालय हिंगोलीच्या वतीने तीन दिवसीय क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धेचे बक्षीस वितरण शहरातील संत नामदेव कवायत मैदानावर करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, कृषी अधीक्षक अधिकारी राजेंद्र कदम, उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण कच्छवे, हिंगोली तालुका कृषी अधिकारी रणखांब, कळमनुरी तालुका कृषी अधिकारी कुंभार, वसमत तालुका कृषी अधिकारी भिसे, सेनगाव तालुका कृषी अधिकारी वळकुंठे, औंढा नागनाथ तालुका कृषी अधिकारी काळे आदींची प्रमुख उपस्थीती होती. क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धेतील विजयी संघांना बक्षीष वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिंगोली जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय हिंगोली च्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आखाडा बाळापूरातील अवैध धंदे बंद करण्याची भाजपची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**
आखाडा बाळापूर येथे सार्वजनिक ठिकाणी तसेच मुख्य रस्त्यासह अनेक ठिकाणी मटका, जुगार तसेच अवैध धंदे सुरू असून यामुळे शाळकरी मुलांसह तरूण व्यसनाधीन होत असून महिलांना या अवैधधंद्यांचा त्रास होत आहे. तत्काळ येथील सर्व अवैध धंदे बंद करण्यात यावे या मागणीचे निवेदन आखाडा बाळापूर भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांना सादर केले आहे.

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर ही सर्वात मोठी ग्रामपंचायत असून मोठी बाजारपेठ आहे. या ठिकाणी परिसरातील ५० ते ६० गावातील शेतकरी, ग्रामस्थ, विद्यार्थी बाजारपेठ, शाळा, महाविद्यालय, दवाखान्यात कामानिमित्त येतात. परंतु आखाडा बाळापूर शहरात सार्वजनिक ठिकाणी तसेच मुख्य रस्त्यावर आणि इतर अनेक ठिकाणी मटका व जुगार अड्डे सुरू आहेत. तसेच अनेक प्रकारचे अवैध धंदे सर्रासपणे सुरू आहेत.

शहरातील किराणा दुकानांसह पानटपरीवर अवैध गुटखा विक्री देखील सुरू आहे. शाळा, महाविद्यालयात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच तरूणांवर याचा दुष्पपरिणाम होत असून व्यसनाधीनता वाढत आहे. या धंद्यांना राजकीय पाठबळ असल्याचे बोलले जात आहे. यापूर्वी भाजपच्यावतीने शहरातील अवैधधंदे बंद करण्यासंदर्भात स्थानिक पोलिसांना निवेदन देण्यात आले होते परंतु अद्याप अवैधधंद्याविरोधात कोणतीही कारवाई न झाल्याने अवैधधंदे चालकांचे मनोबल वाढले असून दिवसरात्र सर्रासपणे अवैध धंदे सुरूच आहेत. नवीन बसस्थानक, शेवाळा रोड येथील अतिक्रमीत जागेत मटका आणि गुटखा विक्री चालू आहे. याचा त्रास शाळकरी मुले, मुली तसेच महिलांना होत आहे. अवैध धंद्यामुळे सामाजिक व्यवस्था दिवसेंदिवस बिघडत चालली असून गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. तत्काळ शहरातील अवैध धंदे बंद करावेत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर शहराध्यक्ष गजानन पाटील बोंढारे, शेरसिंग बावरी, ज्ञानेश्वर चोरमारे, संतोष बोंढारे, वैभव गिरे, गोविंद भिवकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत शिवजन्मोत्सवानिमित्त १७ फेब्रुवारीला कवी संमेलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**
सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती हिंगोली यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरामध्ये कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवजन्मोत्सवानिमित्त सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती हिंगोलीच्या वतीने सोमवार दि.१७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरामध्ये कवी संमेलनचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य विलास आघाव, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब क्षिरसागर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांची उपस्थिती राहणार आहे. या कवि संमेलनासाठी विशेष सहकार्य माधवीताई पाटील गोरेगावकर, मुनिर पठाण आडगांवकर यांचे सहकार्य लाभले आहे. कवि संमेलनात निमंत्रीत कवी अशोक आर्धापुरकर ,प्रा.संध्या रंगारी, डॉ. राधिका देशमुख, प्रा.नामदेव वाबळे, बबन शिंदे, कलानंद जाधव, गणेश आघाव, आन्ना जगताप, प्रा.श्रीराम कर्हाळे, विजय गुंडेकर, नरेंद्र नाईक, रतन आडे, पांडुरंग गिरी, दिलीप धामणे, डॉ.निखील नायक, राजकुमार नायक, कैलास कावरखे, गणपत माखणे, गणेश येवले, वंदना काबरा, मिरा कदम, सुनिता घोडगे, पारिजात देशमुख, सोनु अग्रवाल, पल्लवी अटल, सुमन दुबे, यु.एच.बलखंडे, बबन मोरे, शिवाजी कर्हाळे, रघुनाथ घुगे, बालाजी शेळके, अभय भरतीया, गजानन मेटकर, संदिप पाटील गोरेगावकर, प्रद्युम्न गिरीकर, श्रीकांत वडकुते आदींची उपस्थिती राहणार आहे. या कवि संमेलनासाठी समन्वयक विजय गुंडेकर मो. ८३८०८०१२५६, सिंधुताई दहिफळे मो.८९९९८८५८४५, राजकुमार मोरगे मो.९८३४९४४५२५, कलानंद जाधव मो.९४०३८०१२७३, दिलीप माधणे मो.८२०८४५६७९३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन, असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष ॲड. उल्हास पाटील, सचिव सागर डांगे, कार्याध्यक्ष बिरजु यादव, कोषाध्यक्ष शुभम बहिरे व सर्व पदाधिकार्यांनी केले आहे.

# पोलिस व्हॅन धक्का मारण्याची वेळ, शहर पोलिस ठाण्यातील प्रकार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**
येथील शहर पोलिस ठाण्यात पोलिसांसाठी असलेली पोलिस व्हॅन बिघडल्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांनाच व्हॅनला धक्का मारून चालू करण्याची वेळ आल्याचे दिसून आले.

११ फेब्रुवारीपासून जिल्हाभरात बारावीची परीक्षा सुरू झाली आहे. यासाठी विविध परीक्षा केंद्रांना भेटी देण्यासाठी पोलिस व्हॅनची गरज आहे. परंतु शहर पोलिस ठाण्यात एक पोलिस व्हॅन परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी सज्ज होती परंतु तिच्यात काहीतरी बिघाड झाल्यामुळे ती चालू होत नसल्याने चक्क पोलिस कर्मचाऱ्यांना खाली उतरून पोलिस व्हॅनला धक्का मारण्याची वेळ आली आहे. पोलिस दलात पोलिस व्हॅनची कमतरता असल्यामुळे तसेच अनेक वाहने जुनी झाल्यामुळे अशा प्रकारची वेळ पोलिसांवर येत असल्याचे बोलले जात आहे.

बारावीच्या परीक्षा केंद्रांवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच वेळेवर पोहोचण्यासाठी पोलिस व्हॅनची नितांत आवश्यकता आहे परंतु अशाप्रकारे पोलिस व्हॅन बंद पडल्यास पोलिस वेळेवर कसे पोहोचणार तसेच कायदा व सुव्यवस्था कसे सांभाळतील असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे.

# एनएमएमएस परीक्षेत शांताबाई दराडे विद्यालयाचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**
भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी एन.एम. एम. एस. परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. एकूण वीस विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी चार विद्यार्थी सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. हनुमान गजानन जाधव १२० गुण,सृष्टी वायचाळ १०६ गुण, कृष्णा पडोळे १०५ गुण,साईराम सुरूसे ९३ गुण मिळाले आहेत. या विद्यार्थ्यांना शाळेतील प्रवीण राऊत, विनोद शिंदे, भारत शिंदे या अध्यापकांनी मार्गदर्शन केले. अध्यापक इयत्ता सातवी पासून सुरुवात करून आठव्या वर्गात आल्यावर वर्षभर अध्यापना सोबतच सातत्याने प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव सुद्धा करून घेतला व होणाऱ्या चुका लक्षात आणून दिल्या. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या भविष्यातील एमपीएससी व यूपीएससी सारख्या परीक्षांची काही प्रमाणात तयारी सुद्धा झाली. याबद्दल शाळेच्या व संस्थेच्या वतीने मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसीदास चिलमुल यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक अध्यापकांचे सत्कार केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व अध्यापकांचे अभिनंदन केले.

